दैनिक
लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२८० ●पृष्ठे-०४ ●ठाणे, गुरुवार, २८ मार्च २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

'शिवाजी पार्क'वर सभांचा धुरळा; मैदानासाठी पाच पक्षांचे महापालिकेकडे अर्ज

■मुंबई, यश सावंत :

दादर मधील शिवाजी पार्क मैदानावर प्रचारसभा घेण्यासाठी सर्वच महत्त्वाच्या राजकीय पक्षांनी मुंबई महापालिकेकडे अर्ज केले आहेत. शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी (अजित पवार गट), भाजप, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, शिवसेना (ठाकरे गट) या पक्षांनी विविध तारखांना मैदान देण्याची विनंती केली असून त्यामुळे लोकसभा निवडणूक काळात शिवाजी पार्कात सभांचा धुरळा उडण्याची शक्यता आहे. शिवाजी पार्क आणि राजकीय सभा हे जुने नाते आहे. त्यातही दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेनेबरोबरचे मैदानाचे नाते अधिक घट्ट आहे. शिवसेनेमध्ये उभी फूट पडल्यानंतर होणारी ही पहिली निवडणूक असल्याने शिवाजी पार्क गाजविण्यासाठी दोन्ही पक्ष आतूर आहेत. या दोन पक्षांखेरीज आणखी तीन पक्षांनी मैदानावर सभेच्या परवानगीसाठी महापालिकेच्या जी उत्तर विभागाकडे अर्ज केले आहेत. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनीही याला दुजोरा दिला असून तारखांबाबत तपशील देण्यास मात्र नकार दिला. सर्व अर्ज मंजुरीसाठी राज्य सरकार आणि निवडणूक आयोगाकडे पाठवण्यात येतील असेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. प्रचारसभांच्या गदारोळात जाणता राजा या नाटयप्रयोगासाठीही अर्ज आल्याची माहिती सूत्रांनी दिली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार शिवसेनेचा ठाकरे गट आणि मनसेने एकाच दिवशी, म्हणजे १७ मे रोजी सभेसाठी अर्ज केला आहे. त्यामुळे आता या तारखेला कुणाला परवानगी मिळणार यावरून वाद रंगण्याची चिन्हे आहेत. दुसरीकडे अन्य तारखांसाठीही पक्षांनी मोचेबांधणी केली आहे. शिंदे गटाने १६, १९, २१ एप्रिल आणि ३, ५ व ७ मे या तारखांना सभा घेण्यासाठी अर्ज केला आहे. अजित पवार गटाने २२, २४, २७ एप्रिल तर भाजपने २३, २६, २८ एप्रिलला मैदान मिळावे, अशी विनंती केली आहे.

लोकसभा निवडणुकीसाठी राज्यात पहिल्यांदाच डॉक्टरांना कामाला जुंपणार

■मुंबई, विशाल कारंडे :

शिक्षकांना निवडणुकीच्या कामाला जुंपू नये अशी मागणी होत असतानाच आता थेट डॉक्टरांना देखील निवडणुकीच्या कामाला लावले जाणार आहे. मुंबईच्या इतिहासात पहिल्यांदाच डॉक्टरांना इलेक्शन ड्युटी लावली जाणार आहे. यामुळे रुग्ण सेवेची जबाबदारी असणाऱ्या डॉक्टरांना आता निवडणुकीचे अतिरीक्त काम करावे लागणार आहे. मुंबई महापालिकेच्या केईएम,सायन, नायर, कुपर आणि नायर डेंटल रूग्णालयातील सुमारे ५०० डॉक्टरांना लागली इलेक्शन ड्युटी लावली जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. नर्सेसपासून डिनपर्यंत सर्वांना निवडणुकीचे काम लागल्याने रूग्णसेवेवर याचा परिणाम होणार आहे. मुंबई महापालिका रूग्णालयांतील सुमारे ८० टक्के स्टाफ इलेक्शन ड्युटीवर जाणार आहे. निवडणूक कामातून डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचा-यांना सूट असतानाही निवडणूक आयोगाने डॉक्टरांना निवडणूक डयुटीवर हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. केईएम रूग्णालयातील ९०० पैकी ६०० नर्सेसना इलेक्शन ड्युटी लावण्यात आली आहे. यामुळे पालिकेच्या प्रमुख रूग्णालयातील आरोग्य सेवा ठप्प पडण्याची भिती व्यक्त केली जात आहे. निवडणूक आयोग शिक्षकांना कामाला लावतं मग निवडणूक आयोग काय काम करतं? राज ठाकरेंचा सवाल

निवडणूक आयोगाच्या कामावरून राज ठाकरेंनी अनेक सवाल उपस्थित केले होते. निवडणूक आयोग शिक्षकांना कामाला लावतं मग निवडणूक आयोग काय काम करतं ? ५ वर्षे निवडणूक आयोगाला काय काम असतं असा सवाल राज ठाकरेंनी उपस्थित केला होता. शारदाश्रम शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांनी राज ठाकरेंची भेट घेऊन शिक्षकांना निवडणूक आयोगाच्या कामाला लावल्याची तक्रार केली होती. मुंबईतून ४१३६ शिक्षकांना आयोगाच्या कामाला लावल्याने मुलांना शिकवणार कोण? असा प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी शिक्षकांनी निवडणूक आयोगाच्या कामाला रुजू होऊ नये. कोण कारवाई करतो ते बघतोच असा इशारा राज ठाकरे यांनी दिला होता. निवडणुकीच्या कामातून शिक्षकांना शिक्षकांना वगळून अन्य कर्मचा-यांना काम देण्याबद्दलच्या सर्व शक्यता तपासून तातडीने उपाययोजना कराव्या, असे आदेश मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी दिलेत. यासंदर्भात मुंबईचे आयुक्त, जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी तातडीची बैठक घ्यावी, असंही सांगण्यात आले होते. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांस निवडणुकीशी संबंधित कामावर नियुक्त केल्यास त्यांना त्यांच्या शैक्षणिक कामाच्या दिवशी व वेळेस निवडणुकीचे काम दिले जाणार नाही, याबाबतची दक्षता घेण्यात यावी असंही या आदेशात नमूद करण्यात आलं होते.

महामार्गावरील अंगाडिया सव्वा पाच कोटींची लूट प्रकरणी धारावीचा कुख्यात डॉनसह चौघांना अटक

■वसई, सचिन कदम :

मुंबई अमहदाबाद महामार्गावरील विरारजवळ अंगाडियाची गाडी अडवून सव्वा पाच कोटी रुपयांची रोकड पळविर्णाया आरोपींना गुन्हे शाखा ३ च्या पथकाने अटक केली आहे. यामध्ये अंगाडियाचा चालक तसेच या टोळीचा सुत्रधार मुरूगन याला समावेश आहे. मुरूगन हा धारावी येथील कुख्यात डॉन म्हणून ओळखला जातो. पोलिसांनी लुटीमधील ४ कोटी ८५ लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात यश मिळवले आहे. १७ मार्च रोजी मुंबईच्या काळबादेवी येथे राहणारे श्रावण ठाकूर (२४) हे अंगाडिया आपल्या सहर्कायासह गुजरातला निघाले होते. रात्री ९ च्या सुमारास डोळ्यावर झोप येत असल्याचे सांगत चालक बाबू स्वामी याने महामार्गावजवळील विरारच्या खानिवडे टोल नाक्याजवळ येऊन गाडी थांबवली होती. याच दरम्यान, त्यांच्या मागून आलेल्या एका वाहनातून ५ जण उतरले. पोलीस असल्याची बतावणी करत त्यांनी फिर्यादी आणि त्याच्या सहकाऱ्याला मारहाण केली आणि ५ कोटी १५ लाख रुपयांची रोकड लंपास केली होती. या प्रकरणी मांडवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता. या लुटीच्या घटनेने खळबळ उडाली होती. या प्रकरणी गुन्हे शाखा ३ च्या पथकाने तपास करून चालक बाबू मोडा स्वामी (४८) याला ताब्यात घेतले. अधिक चौकशीनंतर या प्रकरणात ४ जणांना अटक केली. त्या मध्ये मुरगननंद अभिमन्यू उर्फ मुरगन अण्णा (४६), बालाप्रभू शनमुगन (३९) आणि मनीकंडन चलैया (५०) यांना चौघांना अटक केली. तर दोन आरोपी फरार आहेत. पोलिसांनी आरोपींकडून ४ कोटी ८७ लाखांची रोकड तसेच गुन्ह्यात वापरेलेले वाहन आणि अडीच लाखांचे मोबाईल जप्त केले आहेत. गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा ३ चे प्रमुख पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, पोलीस उपनिरीक्षक अभिजित टेलर, उमेश भागवत, तसच अशोक पाचील, मनोज चव्हाण, सचिन घेरे, मुखेश तटकरे, सागर बावरकर आदीच्या पथकाने या प्रकरणाचा छडा लावला. या प्रकरणाचा सुत्रधार मुरूगननंद अभिमन्यू हा धारावी परिसरात मुरूगन अण्णा म्हणून प्रसिध्द आहे. एका हत्या प्रकरणात तो दहा वर्ष तुरूंगात राहून परतला आहे. या परिसरात त्याचा दबदबा असून विविध राजकारणी आणि सेलिब्रेटी त्याच्या वाढदिवस कार्यक्रमांना उपस्थित राहत असतात. त्याचे व्हिडियो यू ट्यूबवर अपलोड केलेले आहेत. त्याने एका विद्यापीठातून मानद डॉक्टरेट पदवी देखील मिळवली आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. लुट केल्यानंतर आरोपींनी सायन येथील मुरूगनच्या घरात सर्व रोकड जमा करून पैशांचे वाटप केले होते.

सिडकोच्या जमिनीवरील बेकायदा निवासी इमारत पाडण्याचे हायकोर्टाचे आदेश



■नवी मुंबई, नितीन देवळेकर :

कोणतीही परवानगी न घेता बांधकाम करा आणि महापालिकेने नोटीस बजावल्यावर बांधकाम नियमित करण्यासाठी अर्ज करा, ही बाब नित्याची झाली आहे. भलामोठा दंड आणि शुल्क आकारून संपूर्णपणे बेकायदा असलेली बांधकामे नियमित करा, ही गोष्ट मान्य करण्यासारखी नाही. नियमित करण्याची परवानगी देणाऱ्या विशेषाधिकारामुळे कायदा मोडण्याचा परवाना मिळत नाही, असे बजावत उच्च न्यायालयाने सिडकोच्या मालकीच्या जमिनीवर उभी असलेली इमारत तोडण्याचे आदेश नवी मुंबई महापालिकेला दिले. सरकारी संस्थांचे भूखंड बळकावणे व त्यावर बेकायदा बांधकाम करणे, ही डोकेदुखी एकट्या नवी मुंबईची नाही. राज्यातील सर्वच महापालिकांची आहे. बेकायदा बांधकामांवर लक्ष ठेवण्यासाठी डिजिटली तयार असायला हवे, असे न्या. गौतम पटेल व न्या. कमल खटा यांच्या खंडपीठाने म्हटले. याचिकादाराने कोणत्या अधिकारांतर्गत याचिका केली, हे स्पष्ट न केल्याने खंडपीठाने स्वयंप्रेरणेने याचिका दाखल करून घेतली. संबंधित सोसायटीतील २९ फ्लॅटपैकी २३ फ्लॅट विकले असून पाच रिकामे आहेत. न्यायालयाने सर्व फ्लॅटधारकांना नोटीस बजावली व त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. परंतु, दिलासा देण्यास नकार दिला. दंड आकारून, नुकसान भरपाई घेऊन बेकायदा बांधकामे नियमित करण्यास परवानगी दिली जाऊ शकत नाही, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले. बेकायदा बांधकाम केल्यावर किंवा परवानगी नाकारल्यावर बांधकाम नियमित करण्यासाठी परवानगी मागू शकत नाही, असेही न्यायालयाने यावेळी स्पष्ट केले. या प्रकरणात, संपूर्ण बांधकाम बेकायदा आहे. फ्लॅटधारकांना नोटीस बजावण्यात आल्याने त्यांनी सहा आठवड्यांत फ्लॅट खाली करावे. त्यानंतर दोन आठवड्यांनी इमारत जमीनदोस्त करावी, असे आदेश न्यायालयाने पालिकेला काही दिवसांपूर्वी दिले.

महावितरणच्या गलथान कारभाराचा ग्राहकांना फटका; महावितरणच काम, मिटरसाठी ११ महीने थांब

■ठाणे, दिगंबर जाधव :

महावितरणच्या भोगंळकारभाराचा ठाणेकर नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. नवीन मीटर लावण्यासाठी वारंवार पत्रव्यवहार करुनही महावितरणकडे मीटर नसल्याचे सांगितले जात आहे. एकीकडे महावितरणकडे मीटर नसतांना खाजगी दुकानदाराकडे मात्र मीटर असल्याची गंभीर बाब समोर येत आहे. त्यामुळे ग्राहकांना खिशाला कात्री मारुन हे मीटर विकत घ्यावे लागत आहेत. परंतु जे ग्राहक थांबतात, त्यांना नवीन मीटरसाठी तब्बल ११ महिन्याहून अधिकचा कालावधी जात असल्याचे दिसत आहे. महावितरणकडून येणाऱ्या वाढीव बिलामुळे आधीच ठाणेकर ग्राहक हैराण झाले आहेत. त्यात आता नवीन मीटरसाठी सहा सहा महिने थांबावे लागत असल्यानेही त्याचा नाहक भुर्दंड ठाण्यातील ग्राहकांना सहन करावा लागत आहे. ठाण्यातील असंख्य ग्राहकांना महावितरणच्या या गलथान कारभाराचा फटका बसला आहे. काहींचे मीटर मागील काही महिन्यापासून बंद आहेत, ते मीटर बदलून मिळावे यासाठी ते वारंवार महावितरणच्या कार्यालयाचे खेटे घालत आहेत. परंतु त्यांना नवीन मीटर बसवून मिळत नाही. या

उलट फॉल्टी मीटर दाखवून त्यांना सरासरी वाढीव बिल महावितरणकडून दिले जात आहे. ते कमी करण्यासाठी पुन्हा महावितरणच्या खेटा घालाव्या लागत आहेत. त्यासाठी कामाचे खाडे करावे लागत आहेत. परंतु महावितरणकडून उडवा उडवीची उत्तरे मिळत आहेत. त्यात एखाद्या ग्राहकाने मीटरसाठी तगादा लावलाच तर त्याला ठाण्यातील एका खाजगी दुकादाराचा पत्ता दिला जात असून त्याच्याकडून मीटर घ्या असे सांगितले जात आहे. परंतु त्याचा नाहक भुर्दंड ग्राहकांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे महावितरणकडे मीटर नसतांना खाजगी दुकानदाराकडे मीटर कसे असा सवाल या निमित्ताने उपस्थित झाला आहे. त्यातही तुमच्याकडे मीटर नाही का? असे विचारल्यास वरीष्ठ पातळीवरुनच आम्हाला मीटर प्राप्त होत नसल्याचे उत्तर महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडून दिले जात आहे.

संशयास्पद हालचाली टिपन्यासाठी रेल्वे प्रवाशांवर 'एआय' कॅमेऱ्यांची नजर

■पुणे, अभिजीत येरुल्लू :

पुणे रेल्वे स्थानकात आता कृत्रिम प्रज्ञा (एआय) तंत्रज्ञानाधारित कॅमेऱ्यांतून नजर ठेवली जात आहे. स्थानकाचे प्रवेशद्वार आणि तिकीट आरक्षण केंद्राच्या परिसरात चार अत्याधुनिक 'इंटरनेट प्रोटोकॉल कॅमेरे' बसविण्यात आले आहेत. कृत्रिम प्रज्ञेच्या सहाय्याने हे कॅमेरे स्थानकातील संशयास्पद हालचाली टिपत आहेत. त्याबाबत ते रेल्वे प्रशासनाला तातडीने माहितीही देत आहेत. रेल्वे मंत्रालयाने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कामकाजात अधिकाधिक व्हावा, यासाठी पावले उचलली आहेत. याअंतर्गत प्रत्येक रेल्वे विभागाला कोणत्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करता येईल, याबाबत प्रस्ताव मागविले होते. पुणे विभागाने एकूण सात प्रकल्प मुख्यालयाकडे सादर केले होते. त्यातील टेहळणी यंत्रणेचा प्रस्ताव मुख्यालयाने मंजूर केला. त्याअंतर्गत हा पथदर्शी

प्रकल्प राबविला जात आहे. आता स्थानकावर इंटरनेट प्रोटोकॉल कॅमेरे बसवून टेहळणी केली जात आहे. जिओ प्लॅटफॉर्म्सची उपकंपनी जिओ थिंग्ज लिमिटेड कंपनीला हे काम देण्यात आले आहे. रेल्वे स्थानकाचे प्रवेशद्वार आणि बाहेर पडण्याचे द्वार, आरक्षण केंद्रातील तिकीट खिडक्या येथे हे चार कॅमेरे बसविले आहेत. यामुळे प्रवाशांची संख्या मोजणे आणि ते रांगेत आहेत की नाहीत या बाबी कळत आहेत. रेल्वे स्थानकातील संशयास्पद हालचाली, तिकिटाचा काळाबाजार, बेकायदा पद्धतीने रांगा लावणे आदी गोष्टी या कॅमेऱ्यांमुळे शोधता येत आहेत. त्यामुळे त्यांना आळा घालणेही शक्य होत आहे. रेल्वेतील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, स्थानकातील तिकीट आरक्षण केंद्राच्या परिसरातील एआय कॅमेऱ्यांनी २६ फेब्रुवारी ते ३ मार्च या कालावधीत ९ हजार ६२५ जणांची नोंद केली. त्यातील ७ हजार ३११ वारंवार येणारे आणि २ हजार ३१४ हे पहिल्यांदाच येणारे होते. भेट देणाऱ्यापैकी १ हजार ५०० हून अधिक जण तिकीट खिडकीच्या परिसरात सुमारे पाच मिनिटे होते. याचवेळी सुमारे ७०० ते ९०० जण तिथे सुमारे तासभर रेंगाळत होते.

कशा पद्धतीने नजर?

- स्थानकात येणाऱ्या प्रवाशांची संख्या कळते.
-संशयास्पद हालचाल करणारा प्रवासी ओळखता येतात.
-तिकिटांचा काळाबाजार शोधण्यास मदत होते.
-बेकायदा पद्धतीने लावलेल्या रांगाही कळतात.
-स्थानकातील गैरप्रकारांचाही तातडीने शोध घेता येतो.

कॅश काऊंटर नसलेले भारतातले पहिले रुग्णालय ठाण्यात, रोबोटिक शस्त्रक्रिया मोफत!

■ठाणे, भावना जैन :

ठाण्याच्या मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे या कॅश काऊंटर नसलेल्या भारतातील पहिल्या रुग्णालयामध्ये प्रथमच दोन गरजु महिला रुग्णांवर रोबोटिक मशिनद्वारे गुडघ्याच्या प्रत्यारोपणाची अवघड शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करण्यात आल्या आहेत. दोन्ही रुग्ण आता स्वतःच्या पायावर हिंडु फिरू शकत असल्याने त्यांच्या नातलगांनी या नविन रोबोटीक तंत्रज्ञानाचे तसेच, गंगुबाई शिंदे रुग्णालयाचे विशेष आभार मानले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या दिवंगत मातोश्री गंगुबाई शिंदे यांच्या स्मरणार्थ ठाणे महापालिकेच्या माध्यमातुन ठाण्यातील किसननगर येथे हे कॅश काऊंटर नसलेले गंगुबाई संभाजी शिंदे रुग्णालय सुरू केले आहे. या रुग्णालयात तब्बल १२ लाख रुपये किमतीचे रोबोटिक गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रियेचे मशिन नुकतेच कार्यन्वित करण्यात आले आहे. या मशिनद्वारे बदलापुर येथील पुष्पा केदारे ५० वर्षीय यांच्या उजव्या गुडघ्याचे प्रत्यारोपण करण्यात आले. केदारे यांना गेल्या तीन वषार्पासुन संधीवात झाल्याने त्यांचे पाय वाकडे झाले होते. बसायला व उठायलाही त्रास होत होता.तर, भिवंडीच्या बेबी गायकवाड ६६ वर्षीय महिलेच्या डाव्या पायाच्या गुडघ्याचे प्रत्यारोपण करण्यात आले. चालताना अडखळत चालावे लागत होते. गुडघ्याची शस्त्रक्रिया करण्यासाठी खाजगी रुग्णालयाचा लाखोंचा खर्च या रुग्णांना परवडणारा

नव्हता. काही नातेवाईकाच्या संदभार्ने गंगुबाई शिंदे रुग्णालयाची माहिती त्यांना मिळाली. त्यानुसार रुग्णालयात दाखल केल्यानंतर येथील भुलतज्ज्ञ डॉ.अक्षय राऊत, अस्थीतज्ज्ञ डॉ. सचिन पांडे यांनी या दोन्ही रुग्णांच्या यशस्वी शस्त्रक्रिया नुकत्याच केल्या. याकामी रोबोटीक स्पेशालिस्ट तंत्रज्ञ दुर्गेश तोडणकर, तंत्रज्ञ अजित आहेर, राकेश सोनार यांचेही शस्त्रक्रियेसाठी मौलिक साह्य लाभले. या शस्त्रक्रियेनंतर केवळ एकच दिवस त्रास जाणवल्याचे रुग्णांनी सांगितले. रोबोटीक ही ओपन सर्जरी आहे. एक शस्त्रक्रिया करण्यासाठी साधारण सव्वा तासांचा अवधी लागला. एरव्ही मॅन्युअली ऑथोर्पेडीक ऑपरेशनमध्ये असलेले धोके या मशिनद्वारे केलेल्या शस्त्रकियेमध्ये टाळता येतात. या मशिनचा लाभ म्हणजे याद्वारे केलेल्या शस्त्रक्रियेत कोणतेही इन्फेक्शन्स होत नाहीत अथवा रक्तस्त्राव देखील कमीतकमी होत असल्याने रुग्णाला कोणताही मानसिक व शारीरिक त्रास उद्भवत नसल्याचे डॉ.पांडे यांनी सांगितले. गुडघा प्रत्यारोपणासाठी आलेल्या रुग्णाच्या संपुर्ण शरीराचे सिटी स्कॅन केल्यानंतर ती सर्व माहिती रोबोटिक मशिनच्या संगणकीय मेमरीमध्ये समाविष्ट केली जाते. त्यानंतर मशिनद्वारे शस्त्रक्रिया करण्यासाठी संगणकाद्वारे तयारी केली जाते. रोबोट, पेन्डन्ट, ओटीएस, सर्जिकल प्लॅनिंग केल्यानंतर रोबोट स्वतः ही गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करतो. शस्त्रक्रिये दरम्यान रुग्णाला फारसा त्रास जाणवत नाही. मात्र या शस्त्रक्रिया करताना डॉक्टरांना खूप काळजी घ्यावी लागते. दोनच दिवसात रुग्ण चालु लागतो.₹ - डॉ. सचिन पांडे, ऑथोर्पेडीक सर्जन

ठाण्यात गेली दोन वर्ष सुरू असलेल्या मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे या रुग्णालयामध्ये रुग्णाकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही. शिधापत्रिका धारक गरीब रुग्णांवर अत्यंत महागड्या शस्त्रक्रिया तसेच सर्व औषधोपचार इथे मोफत केला जातो. नुकतेच दोन महिला रुग्णावर रोबोटीक शस्त्रक्रिया करून गुडघ्याचे यशस्वी प्रत्यारोपण करण्यात आले.₹ - डॉ. जालंदर भोर, मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.गंगुबाई शिंदे रुग्णालय.

राज्य सरकारचा निर्णय; शासकीय कर्मचाऱ्यांना मतदानाच्या दिवशी मिळणार भरपगारी सुट्टी

■मुंबई, विशाल पाटील :

राज्यातील लोकसभा मतदारसंघात पाच टप्प्यात मतदान होणार आहे. या लोकसभा निवडणुकीत कामगार, अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदानाच्या दिवशी भरपगारी सुट्टी मिळणार आहे. याबाबतचे शासन परिपत्रक राज्य शासनाने जारी केले आहे. भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. राज्यात या निवडणुकीचे मतदान १९ एप्रिल, २६ एप्रिल, ७ मे, १३ मे व २० मे, २०२४ अशा पाच टप्प्यात होणार आहे. भारत निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक होणार आहे. यामध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्यरितीने बजावता यावा, यासाठी परिपत्रक जारी करण्यात आले आहे. या आदेशानुसार निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही, त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात येणार आहे. ही सुट्टी उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना आदींना लागू राहणार आहे. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचाऱ्यांना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी कमीत कमी दोन तासांची सवलत दिली जाणार आहे. मात्र त्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांची परवानगी घेणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन तासांची सवलत मिळेल, याची दक्षता संबंधित आस्थापनांनी घेणे आवश्यक राहणार आहे. उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व महामंडळे, उद्योग समूह, कंपन्या व संस्थांमध्ये, औद्योगिक उपक्रम इत्यादींच्या आस्थापनांना या सूचनांचे योग्य ते अनुपालन होईल, याची काटेकोरपणे खबरदारी घ्यावी लागणार आहे. मतदारांकडून मतदानाकरिता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबत तक्रार आल्यास, त्यांच्याविरुद्ध योग्य कारवाई करण्यात येणार आहे, अशा सूचनाही या आदेशाद्वारे देण्यात आल्या आहेत.

ठाणे मनपाचा सध्या तरी पाणी कपातीचा निर्णय नाही; ठाणेकरांना तुर्तास जलदिलासा

■ठाणे, रोहित जैसवाल :

मुंबई आणि ठाणे शहरातील पाण्याचा मुख्य स्त्रोत असलेल्या भातसा धरणात जेमतेम ३१ टक्के पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. हा पाणीसाठा दोन महिने पुरेल एवढाच असल्याने शहरांवर पाणी कपातीचे संकट ओढावण्याची भिती व्यक्त होत असली तरी पाणी कपातीबाबत संबंधित प्राधिकरणाकडून कोणतेही आदेश लागू करण्यात आलेले नाही. यामुळे ठाणे महापालिकेने अद्याप तरी पाणी कपातीबाबत कोणताही निर्णय घेतलेला नसल्यामुळे ठाणेकरांना तुर्तास

तरी जलदिलासा मिळाल्याचे चित्र आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात चार स्त्रोतांमार्फत दररोज ५८५ दशलक्षलीटर इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. त्यात महापालिकेच्या स्वतःच्या योजनेतून २५० दशलक्षलीटर, स्टेम प्राधिकरणाकडून ११५ दशलक्षलीटर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून १३५ दशलक्षलीटर आणि मुंबई महापालिकेकडून ८५ दशलक्षलीटर इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. त्यामुळे हे सर्वच स्त्रोत शहरातील पाणी पुरवठ्याच्या दृष्टीकोनातून महत्वाचे मानले जातात. यापैकी ठाणे महापालिका स्वतःच्या योजनेसाठी भातसा धरणातून पाणी उचलून त्याचा शहरात पुरवठा करते. त्याचप्रमाणे मुंबई महापालिकाही भातसा धरणातून पाणी उचलून त्याचा ठाणे शहरात पुरवठा करते. अशाप्रकारे भातसा धरणातून ठाणे शहराला एकूण ३३५ दशलक्षलीटर इतका पाणी पुरवठा दररोज होतो. त्यामुळे पाणी पुरवठ्याच्या दृष्टीकोनातून हे धरण महत्वाचे मानले जाते. मुंबई शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या सात धरणातील पाणीसाठा ३२ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. यामध्ये भातसा धरणाचाही समावेश आहे. या धरण क्षेत्रात ३१.६१ टक्के इतकाच पाणी साठा शिल्लक आहे.

गेल्यावर्षी धरणात ३७.९० टक्के तर, २०२२ मध्ये ४३.६२ टक्के इतका पाणीसाठा शिल्लक होता. गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत यंदा धरणात पाणीसाठा कमी आहे. दोन महिने पुरेल एवढाच पाणीसाठा शिल्लक आहे. यामुळे धरणातील पाणीसाठ्याचे नियोजन करण्यासाठी पाणी कपात लागू होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

असे असले तरी संबंधित प्राधिकरणाने अद्याप तरी पाणीकपातीबाबत कोणतेही आदेश पालिकांना दिलेले नाहीत. यामुळे पालिकांनी कोणतीही कपात लागू केलेली नाही. पालिकांकडून नेहमीप्रमाणेच पाणी उचलून त्याचा शहरात पुरवठा केला जात आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रात भातसा धरणातून पाणी पुरवठा करण्यात येतो. या धरण क्षेत्रातील पाणीसाठा कमी झाल्याबाबत किंवा पाणी कपातीबाबत संबंधित प्राधिकरणाने अद्याप कळविलेले नाही. यामुळे शहरात सध्या तरी कोणतीही पाणी कपात लागू करण्यात आलेली नसून याठिकाणी नेहमीप्रमाणेच पाणी पुरवठा सुरू आहे.-

विनोद पवार (उपनगर अभियंता, ठाणे महापालिका)

//सुविचार

'आयुष्याची प्रत्येक सकाळ अटींसह येते
आणि आयुष्याच्या प्रत्येक संध्याकाळी काहीतरी अनुभव देते..!!.'

हिमोग्लोबिन कमी आहे? मग आहारात करा चवळीचा समावेश

ठराविक भाज्या खाण्याचा कंटाळा आला की गृहिणी अशा वेळी एखादी कडधान्याची उसळ किंवा त्यापासून तयार केलेला चटपटीत पदार्थ मुलांच्या पानात वाढतात. विशेष म्हणजे अनेक लहान मुलांना कडधान्य आवडतात. मात्र, यामध्येदेखील मटकी, मूग, वटाणे ही कडधान्य अधिक खाल्ली जातात. त्याच्या तुलनेत चवळी फारशी खाल्ली जात नाही. परंतु, चवळी खाण्याचे अनेक फायदे असून ती शरीरासाठी अत्यंत गुणकारी असल्याचं सांगण्यात येत. त्यामुळे चवळी खाण्याचे नेमके फायदे कोणते ते जाणून घेऊयात.

चवळी खाण्याचे फायदे

▮ बद्धकोष्ठतेचा त्रास असल्यास दूर होतो. ▮ शरीराला आवश्यक असणारी नैसर्गिक ऊर्जा मिळते. ▮ कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात राहते. ▮ शरीरात वाढलेली अतिरिक्त चरबी कमी होते. ▮ रक्तातील हिमोग्लोबिनची पातळी वाढते. ▮ घसा सुजल्यास चवळीची पानं पाण्यात टाकून ते उकळवावी. त्यानंतर या पाण्याने गुळण्या कराव्यात.

जीन्स परिधान करताना या गोष्टींची काळजी घ्या

आजच्या काळात जीन्स घालणे बऱ्याच मुलींना आवडत, आपल्या घरातील वार्डरोबचा हा एक अगदी सामान्य भाग आहे. आरामदायक असून हे एक स्टायलिश लुक देखील देते. आपणास देखील जीन्स घालायला आवडत असेल आणि आपण परिधान करत असाल तर आपणास जीन्सशी निगडित काही महत्त्वाच्या गोष्टींना जाणून घेणे आवश्यक आहे. कारण जर आपल्याला या गोष्टीं विषयी माहिती नसेल तर त्याचा परिणाम आपल्या संपूर्ण लुक वर देखील होऊ शकतो. म्हणून जीन्स खरेदी करताना आपल्याला काही गोष्टींची काळजी घ्यावी.

▮ जर आपण लो-वेस्ट जीन्स घालत आहात, तर याच्या सह क्रॉप टॉप परिधान करू नका. हे आपले संपूर्ण लुक खराब करू शकत. म्हणून लो-वेस्ट जीन्स घालताना टॉपची काळजी घ्या.

▮ नेहमी सोबर आणि सौम्य रंग निवडा. खूप भडक रंग निवडू नका. हे आपल्या संपूर्ण लुकला खराब करू शकतं. म्हणून भडक रंगाची निवड करू नका. या ऐवजी सौम्य आणि साजेशी रंग निवडा.

▮ आपल्या साइज आणि चांगल्या फिटिंगची जीन्स घाला. जर आपली उंची कमी आहे तर हाय राइझ डेनिम जीन्स घाला.

▮ स्किनी जीन्स परिधान करताना काळजी घ्या की आपण सीमलेस अंतर्वस्त्र घालण्याची चूक करू नका हे आपल्या संपूर्ण लुकला खराब करू शकत.

▮ आपल्या कम्फर्टचा विचार करूनच जीन्स निवडा. फॅशन मध्ये काही असे करू नका ज्यामुळे आपण कम्फर्ट नसाल. म्हणून विचारपूर्वकच जीन्स घाला.

अशक्तपणा येतोय? मग आहारात करा फणसाचा समावेश

फणस हे एकमेव असं फळ आहे जे अबाल-वृद्धांपासून साऱ्यांनाच आवडतं. बाहेरुन कितीही काटे असले तरी आत रसाळ गोड गरे असतात. त्यामुळे फणस हा अनेकांच्या आवडीचा असतो. साधारणपणे फणस गोड लागतो किंवा त्यांची एक खास चव असते त्यामुळे तो खाल्ला जातो. परंतु, फणस खाण्याचे अनेक शारीरिक फायदे आहेत. त्यामुळे फणसपोळी, फणसाचा गर, सरबत या सारख्या विविध पदार्थांमधून गृहिणी आपल्या कुटुंबाला फणस खायला देतात. त्यामुळे फणस खाण्याचे नेमके फायदे कोणते ते पाहुयात.

फणस खाण्याचे फायदे

■ फणसामुळे शरीराची योग्य वाढ होण्यास मदत मिळते.
■ अशक्तपणा, जुना ताप दूर होतो
■ अतिसार होत असल्यास उपयोगी
■ शारीरिक ताकद वाढते.
■ सांधेदुखी असल्यास फणसाची कोवळी पानं गरम करुन त्याचा सांध्यावर शेक द्यावा.
■ शरीरावर मोठे फोड किंवा बेंड झाल्यास त्यावर फणसाचा चीक लावावा. त्यामुळे सूज कमी होऊन पू बाहेर पडतो.

आपल्या फुफ्फुसांना बळकट करण्यासाठी हे करा

कोरोनाचा प्रादुर्भाव वाढतच आहे. लोक या पासून वाचण्यासाठी आपली प्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी बरेचशे उपाय अवलंबवत आहे. सामाजिक अंतर राखून, वारंवार आपले हात धुऊन, मास्क वापरून आपण या पासून आपला बचाव करू शकतो. कोरोना व्हायरस मध्ये सर्वात जास्त त्रास अशा लोकांना होतो ज्यांना श्वासाचा त्रास आहे किंवा ज्यांचे फुफ्फुस कमकुवत आहे. संशोधकांच्या म्हणण्यानुसार, कोरोनाच्या आजाराला मृत्युमुखी पडणाऱ्या लोकांमध्ये त्यांचे प्रमाण सर्वात जास्त आहे जे कोणत्या न कोणत्या आजाराने तसेच श्वासाच्या आजाराने झुंजतं होते किंवा ज्यांची फुफ्फुस कमकुवत होती. अशा परिस्थितीत आपण आपल्या फुफ्फुसांना बळकट करणं आवश्यक आहे आणि आपल्या खाण्यापिण्यात असं काही समाविष्ट करावे जेणे करून आपले फुफ्फुस बळकट करण्यास मदत मिळेल.

१ अक्रोड : अक्रोड मध्ये ओमेगा 3 फॅटी ऍसिड नावाचे ऍसिड आढळतं. जे श्वासाचा त्रास आणि दम्यासारख्या आजारांवर फायदा देतं. या साठी आपण आपल्या आहारात दर रोज 1 मूठ अक्रोड समावेश करावे.

२ सफरचंद : संशोधकांच्या म्हणण्यानुसार, जर आपल्याला निरोगी फुफ्फुसे हवे असतील तर आपल्या आहारात व्हिटॅमिन, सी, ई आणि बी आवर्जून समाविष्ट करावे. जे आपल्या फुफ्फुसांना निरोगी ठेवण्यास मदत करतील. आपल्याला दररोज एक सफरचंद खाणे आवश्यक आहे.

३ आलं : आलं आपल्या फुफ्फुसांना डिटॉक्सीफाय म्हणजे स्वच्छ करतं, हे फुफ्फुसांना प्रदूषण मुक्त करतं. म्हणून कोरोना साथीच्या रोगात आपण आपल्या फुफ्फुसांना बळकट ठेवण्यासाठी आल्याचं सेवन करावं.

४ पाणी : पाणी आपल्या शरीराला डिटॉक्सीफाय करण्यासाठी मदत करतं. कोरड्या फुफ्फुसात जळजळ आणि सूज येण्याची दाट शक्यता असते. म्हणून शक्य असेल तितकं पाणी प्यावं. निरोगी फुफ्फुसांसाठी स्वतःला हायड्रेट ठेवणं खूप महत्त्वाचं आहे.

५ हळद : आपल्या घरात आढळणाऱ्या हळदीचे बरेच फायदे आहेत. या पैकी एक फुफ्फुसांना बळकट करणे आहे. हळद छाती दाटणे आणि दम्यासारख्या त्रासांपासून सुटका मिळवून देते. आपण दररोज दूध किंवा गरम पाण्या सह अर्धा चमचा हळद घेऊ शकता.

खाण्या-पिण्याच्या व्यतिरिक्त, श्वासोच्छ्वास करण्याचे व्यायाम करावे आणि शक्य तितक्या प्रदूषणाच्या संपर्कात येणं टाळावे. बाहेर किंवा वर्दळीच्या ठिकाणी जातांना नेहमीच मास्कचा वापर करावे.

या लहान -लहान चुका करतात आपल्या नॉन-स्टिक भांडींना खराब

बऱ्याच दिवसापासून घरात नॉन-स्टिक वापरले जात आहे. हे नॉन- स्टिक भांडे वापरण्याचा सर्वात मोठा फायदा असा की या मुळे आपल्याला स्वयंपाक करणे सुलभ आणि सहज होते. हरभराच्या पिठाचा शिरा करावयाचा असेल किंवा ऑमलेट करावयाचे असेल किंवा इतर कोणती डिश करावयाची असेल तर या भांड्यांवर चिटकत नाही. त्यामुळे आपण सहजच अन्न शिजवू शकतो. एवढेच नव्हे तर जे लोकं आपल्या आरोग्याबद्दल अधिक जागरूक आहे आणि आहारात कमी तेल वापरण्यास प्राधान्य देतात. त्यांच्या साठी देखील नॉन-स्टिक पॅन वर अन्न शिजवणे चांगले मानले जाते, कारण या साठी आपल्याला कमी तेल आवश्यक असते. आपल्यातील काही चुका नॉन-स्टिक पॅनच्या कोटिंग ला खराब करतात. चला तर मग त्या चुकांबद्दल जाणून घेऊ या.

धातूची भांडी वापरणे : स्वयंपाक करताना भाजी शिजवण्यापासून पोळी किंवा पॅनकेक शेकण्यासाठी आपल्याला चमच्याची गरज असते. तथापि काही बायका या साठी धातूच्या चमच्यांचा वापर करतात. या मुळे आपला नॉन-स्टिक पॅन खराब होतो. धातूच्या चमच्यांनी पॅन वर स्क्रॅच केल्यामुळे त्याच्या वरील कोटिंगला नुकसान होत. म्हणून नेहमी लाकडाच्या किंवा नॉनस्टिकसाठी मिळणाऱ्या वेगळ्या चमच्यांचा वापर करावा.

अधिक उष्णतेवर अन्न शिजवणे : नॉन-स्टिक पॅन वर अन्न शिजवताना कधी ही अधिक उष्णता वापरू नका. या मुळे दोन तोटे संभवतात. प्रथम हे की अधिक उष्णता नॉन-स्टिकच्या कोटिंगचे नुकसान करू शकते. दुसरं असं की हे हानीप्रद टॉक्सिन सोडतात, या मुळे आपल्या आरोग्यास नुकसान संभवतो.

पॅन गरम करणे : जर आपण नॉन-स्टिक भांड्यांचा वापर करत असाल तर आपल्याला हे करणे टाळावे की कधीही नॉन-स्टिक पॅन वर तेल किंवा तूप टाकण्यापूर्वी प्री-हीट किंवा गरम करू नये. जर आपण असं करत असाल तर या पासून हानीप्रद टॉक्सिन बाहेर पडतात.

कुकिंग स्प्रे वापरणं : आपणास आपले नॉन-स्टिक पॅन वर्षोनुवर्षे तसेच राहावे असं वाटत असल्यास आपण देखील अशी चूक करू नका. जर आपण नॉन स्टिक पॅन वर अन्न शिजवत असाल तर त्या वर कुकिंग स्प्रेचा वापर करू नये. कुकिंग स्प्रे सतत वापरल्याने ते पॅन वर जमून बसत आणि मग त्यांना स्वच्छ करणं अवघड जातं. त्या ऐवजी आपण तेल किंवा लोणी वापरू शकता.

लसूण सोलण्याचा सर्वात सोपा मार्ग

लसूण हा एका खाद्य घटक आहे, जे कोणत्याही खाद्य पदाथार्ची चव पूर्णपणे बदलतं. फक्त बाजारपेठेतच नव्हे तर घराघरात देखील अन्नाची चव वाढविण्यासाठी लसणाचा वापर करतात. आलं-लसूण पेस्ट भाजीत घातले तर वा ! काय सांगावं ! लसणाची एक वेगळीच तीक्ष्ण चव असते. परंतु लसूण वापरण्यासह एक मोठी समस्या आहे आणि ती आहे लसूण सोलण्याची.

लसूण सोलायला खूपच वेळ लागतो. याच कारणास्तव भाजीमध्ये लसणाची फोडणी करण्यास कंटाळा येतो. कदाचित हे आपल्या बाबतीत देखील घडले असणार. चला तर मग आज आम्ही आपल्याला लसूण सोलण्याचा काही सोप्या पद्धती बद्दल सांगत आहोत. ज्यांना अवलंबवून आपण देखील लसणाचा वापर करायला लागणार.

पहिली पद्धत : ही पद्धत फार सोपी आहे आणि अशा पद्धतीने लसूण सोलताना त्याचा रसाने आपले हात देखील चिकट झालेले जाणवणार नाही. या साठी आपण एका वाटीत हलके गरम पाणी घेऊन त्यामध्ये 10 मिनिटे लसूण भिजत ठेवावे. या नंतर आपण लसणाला हाताने चोळून घ्या, आपण बघाल की लसणाचे साल अगदी सोप्या पद्धतीने निघाले आहेत.

दुसरी पद्धत : ज्या वेळी आपल्याला जास्त प्रमाणात लसूण सोलायचे असल्यास ही पद्धत वापरा. या मध्ये खूप वेळ द्यावा लागतो. म्हणून कढईला हलकंसं तापवून घ्या. त्या मध्ये लसणाच्या कांड्या घाला. दोन ते तीन मिनिटे भाजून घ्या. थंड झाल्यावर लसणाला सोळा. लसूण चटकन सोलले जाईल. आपल्याला लसूण सोलायला काहीच त्रास होणार नाही.

तिसरी पद्धत : लसणाला ठेचून देखील त्याला चटकन सोलता येतं. या साठी आपण ओट्यावर किंवा स्वयंपाकघराच्या कट्ट्यावर लसणाच्या कांड्या ठेवून लाटण्याच्या साहाय्याने हलकं ठेचा. असे केल्यानं लसणाच्या वरच्या बाजूचे साल निघतील. त्या नंतर आपण हाताने साल काढू शकता.

चवथी पद्धत : लसणाला गरम करून देखील सोप्या पद्धतीने सोलू शकता. या साठी आपण कढईत लसूण गरम करण्या व्यतिरिक्त मायक्रोवेव्हची मदत देखील घेऊ शकता. आपण फक्त 30 सेकंदासाठी लसणाला मायक्रोवेव्ह मध्ये ठेवा आणि नंतर लसूण सोलून घ्या. लसूण चटकन सोलले जाणार.

या सेलिब्रिटीजला आलेत भुताटकीचे अनुभव

तापसी पन्नू

तापसीने एका मुलाखतीत सांगितले आहे की मी आणि क्रू हैदराबादमधील रामोजी फिल्म सिटीमधील एका हॉटेलमध्ये थांबलो होतो. त्या हॉटेलमध्ये भुताटकी असल्याचे किस्से आम्ही ऐकले होते. पण माझा विश्वास नव्हता.

मात्र रात्री मी झोपलेले असताना मला माज्या खोलीत अजून कोणीतरी असल्याचे जाणवले. मला पावलांचा आवाज ऐकू आला. त्यामुळे मी प्रचंड घाबरले मात्र उठून बघाव येवढी मी बहादुर नाही. त्यामुळे मी गपचुप आहे तशी अंथरुणात पडून राहीले. सकाळी उठल्यावर मी हा किस्सा टीमला सांगितला आणि आम्ही हॉटेल सोडलं.

सन्नी लियोनी

मी राजस्थानमधील एका राजवाड्यात स्प्लिट्सविलाच्या एका सीझनचे शूटिंग करत होतो. रात्री मी माज्या रुममध्ये झोपली असताना मला अचानक माझे शरीर हलत नसल्याचे जाणवले. जणू कोणीतरी मला घट्ट धरून ठेवले होते. असे तीनदा झाल्यानंतर मी सर्व बळएकवटून उठून बसले आणि जोरात ओरडले की ह्यमला एकटे सोडा!ह्ल त्यानंतर मात्र माझं अंग नॉर्मल झालं. शरीरावरचा तणाव गायब झाला. मला हलकं वाटलं. तो भुताटकीचाच अनुभव होतो.

क्रिती सेनन

क्रिती सेनन हीला देखील भुताटकीचा अनुभव आला आहे. यावर बोलताना तिने सांगितले की दिलवालेचे शूटिंग करताना मी माज्या मेकअप आर्टिस्टच्या रुममध्ये गप्पा मारत बसलो होते. तेव्हा तिच्या हॉटेलच्या खोलीत कोणीतरी असल्याचं जाणवलं. बॉडी लोशनची एक बाटली पडली होती, म्हणून तिने ती पुन्हा जागेवर ठेवली, पण ती पुन्हा पडली. तिला आश्चर्य वाटले कारण टेबल हलत नव्हते आणि वाराही नव्हता. रात्री तिला असे वाटले की कोणीतरी तिला ढकलत आहे, आणि तेव्हाच आम्ही सर्व घाबरलो होतो.

सोहा अली खान

गँग्स ऑफ घोस्ट्सच्या शूटिंगदरम्यान सोहा अली खान आणि तिची सहकलाकार माही गिल यांना चित्रपटाच्या सेटवर एक विचित्र अनुभव आला. त्यांना रिकाम्या खोल्यांमधून विचित्र आवाज ऐकू आला. चित्रपटाच्या संपूर्ण कलाकारांनी आपली बॅग भरली आणि लगेचच ते ठिकाण सोडले.

बिपाशा बसू

आत्मा या सिनेमाच्या सेटवर अभिनेत्रीने एका सीनच्या शूटिंगदरम्यान एका महिलेला गाताना ऐकले. जेव्हा टीमने रेकॉर्डिंग पुन्हा वाजवले तेव्हा टेपवर कोणताही आवाज नव्हता. पुढे, भिंतीला टांगलेली एक फोटो फ्रेमही अचानक जमिनीवर पडली. त्यानंतर आमच्या टीमने लगेचच तिथून पळ काढला असे बिपाशाने सांगितले आहे.

दै. लोकरक्षणाय सुडोकू - ४२

2	9		8	1				
8			4		7	9		2
		1		2	6			
						7	8	1
	7	3		4				
5		2				3	4	
					9	4	7	8
6						5		
	4	7			5			

उत्तर सुडोकू -४१

1	4	7	3	5	2	9	6	8
2	3	8	7	6	9	1	4	5
5	6	9	4	8	1	7	3	2
3	7	1	5	4	6	2	8	9
4	2	6	8	9	7	5	1	3
8	9	5	1	2	3	4	7	6
9	8	4	6	7	5	3	2	1
6	5	3	2	1	4	8	9	7
7	1	2	9	3	8	6	5	4

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

दिनविशेष

२८ मार्च

- १७३६: बाजीराव पेशव्यांनी दिल्लीवर हल्ला करुन मोगलांचा पराभव केला.
- १८५४: क्रिमियन युद्ध झ फ्रान्सने रशियाविरुद्ध युध पुकारले.
- १९१०: हेन्री फाब्रे यांनी फाब्रे हायड्राविओन हे पहिले सागरी विमान उडविले.
- १९३०: तुर्कस्तानमधील कॉन्स्टँटिनोपाल आणि अंगोरा शहरांची नावे बदलुन अनुक्रमे इस्तंबुल आणि अंकारा अशी करण्यात आली.
- १९४२: रासबिहारी बोस यांनी टोकियो येथे इंडियन इंडिपेन्डन्स लीग ची स्थापना केली.
- १९७९: अमेरिकेतील थ्री माईल आयलंड या बेटावर असलेल्या अणूभट्टीतून किरणोत्सारी पदार्थांची गळती झाली.
- १९९२: उद्योगपती जे. आर. डी. टाटा यांना राष्ट्रपती आर. वेंकटरमण यांच्या हस्ते भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करण्यात आला.
- १९९८: सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स्ड कॉम्प्युटिंग (उ-ऊअउ) या संस्थेने विकसित केलेला परम-१०००० हा महासंगणक देशाला अर्पण करण्यात आला.
- १९८८: ६१ वि घटना दुरुस्ती करून मतदाराचे किमान वय २१ वर्षांवरून वरून १८ वर्षांवर वर आणण्यात आले
- १८६८: रशियन लेखक मॅक्झिम गॉर्की यांचा जन्म. (मृत्यू: १८ जून १९३६)
- १९२५: अभिनेता राजा गोसावी यांचा जन्म. (मृत्यू: २८ फेब्रुवारी १९९८)
- १९२७: भारतीय शैक्षणिक आणि सामाजिक कार्यकर्त्या विना मझुमदार यांचा जन्म. (मृत्यू: ३० मे २०१३)
- १९६८: इंग्लिश क्रिकेटपटू नासिर हुसैन यांचा जन्म.
- १९४१: ब्रिटिश लेखिका व्हर्जिनिया वूल्फ यांचे निधन. (जन्मः २५ जानेवारी १८८२)
- १९६९: अमेरिकेचे ३४ वे राष्ट्राध्यक ड्वाईट आयसेनहॉवर यांचे निधन. (जन्मः १४ ऑक्टोबर १८९०)
- १९९२: स्थानकवासी जैनांचे सर्वश्रेष्ठ धर्मगुरू आचार्य सम्राट आनंदऋषीजी यांचे निधन.
- २०००: शांताराम द्वारकानाथ तथा राम देशमुख यांचे निधन.

भविष्य

मेष हितशत्रूंना आवर बसेल. भरणी नक्षत्राच्या व्यक्तींना राजकीय लाभ घडतील. कृत्तिका नक्षत्राच्या व्यक्तींना शनिवार खरेदीत फसण्याचा.

वृषभ कृत्तिका नक्षत्राच्या व्यक्तींना सप्ताहारंभ नोकरीत हितशत्रू पीडेचा. १४ व १५ हे दिवस मृग नक्षत्राच्या व्यक्तींना शनिवार प्रवास.

मिथुन सप्ताह काहींना विशिष्ट वेदनेतून हैराण करणारा. बाकी सप्ताहाची सुरुवात पुनर्वसु नक्षत्राच्या व्यक्तींना वैयक्तिक उपक्रमांतून छानच.

कर्क अतिशय संमिश्र ग्रहमान राहील. पुनर्वसु नक्षत्राच्या व्यक्तींना शुक्राच्या राश्यांतराचा पुष्य नक्षत्राच्या व्यक्तींना ता. १५ हे दिवस मोठे गतिमान राहतील.

सिंह यंत्रं, वाहनं आणि कामगार या त्रिघटकांतून उपद्रव निर्माण करणारा सप्ताह. मघा नक्षत्राच्या व्यक्तींनी अपवादात्मक उद्भवू पाहणाऱ्या परिस्थितीचं भान ठेवावं.

कन्या बाकी सप्ताह स्वतंत्र व्यावसायिकांना चांगला प्रतिसाद देईल. हस्त नक्षत्राच्या व्यक्तींचे मोठे व्यावसायिक करारमदार होतील. व्यावसायिक भांडवल पुरवठा होईल. पुत्रचिंता जाईल.

तुला प्रेम संबंधांमध्ये अधिक जवळीक निर्माण होईल. जर तुम्हाला काही मिळवायचे असेल तर आजचा दिवस उत्तम आहे. राजकारणी लोकांच्या संपर्कामुळे तुम्हाला चांगला फायदा होऊ शकतो.

वृश्चिक फक्त आजची संध्याकाळ आणि शनिवारची संध्याकाळ वातालापातून सांभाळावी. प्रेमिकांनी जपून. घरात कोणाचं लग्न ठरवाल. ज्येष्ठा नक्षत्राची व्यक्ती सप्ताहात चैनीवर खर्च करेल.

धनु उत्तराषाढा नक्षत्राच्या व्यक्ती मॅन ऑफ दि मॅच होतील. मूळ नक्षत्राच्या व्यक्तींना ता. १५ हे दिवस मोठे गतिमानच राहतील. राजकीय व्यक्तींकडून लाभ. मात्र शनिवारी वेंधळेपणा टाळा.

मकर आज पार्टनर सोबत बोलताना सतर्क राहा. आज तुमची तुमच्या व्यक्तीकडे एखाद्या गोष्टीबद्दल राग व्यक्त कराल. लहान व्यावसायिकांना आज एखाद्या त्रासाला सामोरे जावे लागेल.

कुंभ शनिभ्रमणाच्या पार्श्वभूमीवर हेच सांगत आहे. बाकी ता. १४ च्या वसंत पंचमीची संध्याकाळ गाठीभेटींतून हृद्य राहील. धनिष्ठा नक्षत्राच्या व्यक्तींना धनलाभ. तरुणांचं नैराश्य जाईल.प्रेमप्रकरणातून गती मिळेल.

मीन अर्थातच जीवनात उत्तम सीक्वेन्स लागतील. उत्तराषाढा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात हट्टीपणा टाळावा. धनिष्ठा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात थट्टामस्करी टाळावी. उत्तरा-भाद्रपदा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात चुकीच्या मित्रांची संगत टाळावी.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

संपादकीय

'विचार'विहीन विलसिते!

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदानास जेमतेम तीन आठवड्यांचा अवधी उरला असून भारतीय जनता पक्ष तसेच काँग्रेस या दोन्हीही पक्षांना आपले उमेदवार जाहीर करण्यास जो विलंब होत आहे, त्यावरून या दोन्ही पक्षांत सारे काही आलबेल नाही, हे स्पष्ट होते. भाजपने सर्वप्रथम आपल्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर करून आघाडी घेतली खरी; मात्र त्यांनी महाराष्ट्रासारखे मोठी गुंतागुंत झालेले राज्य तेव्हा ऑप्शन ला टाकले होते. त्यास जवळपास दोन आठवडे उलटले तरी महाराष्ट्राची ही अवघड प्रश्नपत्रिका सोडवण्यात ना भाजपला यश आले आहे, ना शरद पवार यांनी चार वर्षांपूर्वी उभ्या केलेल्या महाविकास आघाडीला! उमेदवारांची पळवापळव जोरात सुरू आहे. भाजप या करामतीतील मातब्बर भिडू आहे, हे गेल्या दोन-अडीच वर्षांत या पक्षाने ज्या पद्धतीने प्रथम शिवसेना आणि नंतर राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात फूट पाडली, त्यावरून स्पष्ट झाले आहे. मात्र, केवळ खासदारकीसाठी इच्छुक उमेदवार आपापले पक्ष बदलत आहेत, त्यावरून कोणालाच नीतिमत्ता आणि सचोटी यांचे भान उरले नसल्याचे दिसत आहे. अवघ्या काही दशकांपूर्वी देशाला विचार देणारे राज्य म्हणून महाराष्ट्राची ख्याती होती. त्या विचारांना तिलांजली देणारी निवडणूक म्हणून इतिहासात नोंद ठरू शकते! मतदारांच्या मनात त्यामुळे केवळ गोंधळच उडाला नसून, राजकीय पक्ष तसेच नेतेमंडळींबाबत एक प्रकारचे वैफल्य निर्माण होण्याचा धोका आहे. मात्र, कोणत्याच राजकीय पक्षाला वा नेत्याला त्याची कसलीही फिकीर दिसत नाही.महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यात विदर्भात मतदान होत असून, तेथील भाजप तसेच काँग्रेस यांचे बहुतेक उमेदवार जाहीर झाले आहेत. मात्र, अमरावती मतदारसंघाने भाजपसाठी पेच निर्माण केला आहे.तेथे राणा दांपत्याचे प्रस्थ आहे आणि शिवसेनेत फूट पडल्यावर नवनीत राणा यांनी उद्धव ठाकरे यांना अडचणीत आणण्यासाठी शथीर्चे प्रयत्न केले होते. भाजप त्याची बक्षिसी नवनीत राणा यांना देण्यास कमालीचा उत्सुक असला तरी त्यांच्या जात-प्रमाणपत्राचा वाद कोर्टात असल्याने काहीही निर्णय झालेला नाही.महाराष्ट्रातील सर्वात लक्षवेधी लढत ही अर्थातच बारामतीत होत असून, कन्या सुप्रिया सुळे यांना निवडून आणण्यासाठी शरद पवार जातीने डावपेच आखत आहेत. त्यामुळेच त्यांनी २०१४ मध्ये सुप्रिया यांच्या विरोधात पाच लाखांहून अधिक मते घेणाऱ्या महादेव जानकर यांना आपल्या छावणीत आणण्यासाठी शथीर्ने मांडणी केली होती.मात्र, नंतरच्या दोन-चार दिवसांतच भाजपने आपल्या करामती केल्या आणि आता जानकर परभणीतून अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील पक्षाचे उमेदवार म्हणून लढतील, अशी चिन्हे दिसताहेत. बारामतीशेजारच्या शिरूरमध्ये तर अखंड शिवसेनेचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव हे थेट एकेकाळचे आपले कट्टर शत्रू अजित पवार यांची पालखी खांद्यावर घेऊन, त्यांच्या पक्षाचे उमेदवार होतील, अशी शक्यता आहे. महाविकास आघाडीत उमेदवारनिवडीवरून गोंधळाचे वातावरण जरूर आहे, मात्र, भाजप-एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या महायुतीत गेले काही दिवस सुरू असलेल्या शीतयुद्धाला अखेर थेट धुळवडीच्या दिवशीच तोंड फुटले आहे.महायुतीतील हा वाद अर्थातच शिंदे यांचा गड समजला जाणारा ठाणे मतदारसंघ तसेच नाशिक यांच्यावरून पेटला आहे. ठाणे मतदारसंघ हा कोणे एके काळी भाजपचा बालेकिल्ला होता. मात्र, बाळासाहेब ठाकरे यांनी तो भाजपकडून हिसकावून घेतला.आता बारा हत्तींचे बळ अंगी आलेल्या भाजपला तो परत हवा आहे. शिवाय, अखंड शिवसेनेचा बालेकिल्ला समजले नाशिकही भाजपलाच हवे आहे. भाजप ३७०! ही घोषणा प्रत्यक्षात आणण्यासाठी भाजपला किती धडपड करावी लागत आहे, याचीच ही साक्ष आहे.मात्र, त्यामुळे शिंदे गटाचे प्रवक्ते गुलाबराव पाटील यांनी भाजप शिवसेनेला उत्तर महाराष्ट्रात एकही जागा देणार नाही का? असा सवाल जाहीरपणे केला आहे. शिवाय, अजित पवार यांचे बलदंड सहकारी छगन भुजबळ यांनीही नाशकातूनच लोकसभेवर जाण्याची आपली मनीषा लपवून ठेवलेली नाही.महाराष्ट्राच्या या राजकीय दंगलीत आणखी दोन भिडू आहेत. प्रकाश आंबेडकर आणि राज ठाकरे. महाविकास आघाडीला आंबेडकर हवे असले तरी ते आपले पत्ते उघडे करायला तयार नाहीत. तर राज ठाकरे यांनी पुनश्च एकवार कोलांटउडी मारली आहे. मात्र, भाजप त्यांचा ताकास तूर लागू द्यायला तयार नाही. ही निवडणूक विचारसरणीवर आधारित नव्हे, तर नरेंद्र मोदी, शरद पवार, राहुल गांधी आणि उद्धव ठाकरे यांच्या लोकप्रियतेच्या आधारावरच होऊ घातली आहे. या दंगलीत सर्वसामान्य माणसांचे प्रश्न वाहून गेले असून, त्याबद्दल कोणालाही ना खेद ना खंत, अशी स्थिती आहे.अवघ्या काही दशकांपूर्वी देशाला विचार देणारे राज्य म्हणून महाराष्ट्राची ख्याती होती. आता ती प्रतिमा पार धुळीस मिळणार काय, अशी भीती सध्याच्या राजकारणामुळे निर्माण झाली आहे.

पांगुळगाडा पुरे!

अमेरिकेने पाठिंबा दिला नाही तरी आम्ही युद्ध सुरूच ठेवू असे नेतान्याहू म्हणतात. पण अमेरिकेची आर्थिक-लष्करी-राजनैतिक मदत हा इस्त्रायलचा प्राणवायू आहे. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत इस्त्रायल-हमास यांच्यातील युद्धात शस्त्रसंधीची मागणी करणारा ठराव अखेर एकमुखाने मंजूर झाला. यात अखेर असे म्हणायचे कारण याआधी किमान तीन वेळा अशा ठरावांवर अमेरिकेने आपला नकाराधिकाराचा खोडा घालून ते पराभूत केले. या वेळी अमेरिकेने या ठरावावर मतदान केले नाही. ती तटस्थ राहिली. त्यामुळे शस्त्रसंधीची मागणी १४ विरुद्ध शून्य अशा मतांनी मंजूर झाली. याचा फार मोठा धक्का इस्त्रायलला नक्कीच बसला. आपण काहीही करावे आणि अमेरिकेने आंतरराष्ट्रीय मंचावर आपली पाठराखण करत राहावे याची इतकी चटक इस्त्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांना लागलेली आहे की त्यांना कोणी अडवणारा राहिलेला नाही. याचा परिणाम नेतान्याहू सोकावण्यात झाला. आधीच हा गृहस्थ कमालीचा बेमुर्वतखोर, आढयताखोर आणि त्यात भ्रष्ट. या अशा नेत्याचे भूत आणि वर्तमान लक्षात घेता अमेरिकेने ही ब्याद सांभाळण्याची जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेण्याची काहीही गरज नव्हती. इस्त्रायलच्या जन्मापासून अमेरिका ही त्या देशाची राखणकर्ती राहिलेली आहे.

मग ते पंतप्रधान गोल्डा मायर यांच्या काळात अरब देशांनी इस्त्रायलवर संयुक्तपणे केलेला हल्ला असो वा योम किप्पुर किंवा आताचे हमासविरोधातील युद्ध असो. अमेरिकेकडून इस्त्रायलची होणारी आंधळी पाठराखण अजिबात लपून राहिलेली नाही. यामागे अमेरिकेचे यहुद्यांबाबतचे प्रेम उतू जाते, असे अजिबात नाही. पण तरीही अमेरिका सतत इस्त्रायलचे सारे अपराध पोटात घेते. याचे कारण अमेरिकेच्या समाजजीवनात प्रचंड सामर्थ्यवान असलेला यहुदी दबावगट. वित्तसेवा, प्रशासन ते राजकारण वा माध्यमे/ मनोरंजन अशा अमेरिकेच्या सर्व क्षेत्रांत यहुदी व्यक्ती मोठया प्रमाणावर आहेत आणि त्या अमेरिकेच्या प्रशासनावर इस्त्रायलच्या वतीने सातत्याने दबाव आणत असतात. हा दबाव झुगारून देण्यात अमेरिकेचे विद्यमान अध्यक्ष जो बायडेन यांस तितकेसे यश इतके दिवस येत नव्हते. त्यामुळे इस्त्रायलचे फारच फावले. परंतु अखेर बायडेन यांची मंदावलेली सहनशीलता संपली आणि त्यांच्या प्रशासनाने शस्त्रसंधीच्या मागणीस विरोध केला नाही. या घटनेस अनेक अर्थ आहेत आणि तिचे पडसादही अनेक. त्यातील पहिला लगेच दिसून आला. अमेरिकेने शस्त्रसंधीस विरोध केला नाही हे जाहीर झाल्या झाल्या पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी आपला अमेरिकेचा दौराच रद्द केला. या दौऱ्यात ते अध्यक्ष बायडेन यांच्याशी गाझा युद्धातील आगामी पावलांविषयी चर्चा करणार होते. पण अमेरिकेच्या या बदलत्या भूमिकेमुळे रागावून त्यांनी आपली अमेरिका भेट रद्द केली. घरातील अतिलाडामुळे जास्तच शेफारून गेलेल्या लाडावलेल्या चिरंजीवाने कशास नाही म्हटल्यावर फुरंगटून बसावे तसे हे झाले. इतकेच नाही, तर नेतान्याहू यांनी अमेरिकेच्या या बदललेल्या भूमिकेचा निषेध केला आणि त्यामुळे हमाससारख्या दहशतवादी संघटनेचे फावेल, अशा अथार्चे मत व्यक्त केले.

प्रत्यक्षात परिस्थिती उलट आहे. अमेरिकेच्या आजवरच्या बोटचेप्या भूमिकेमुळे उलट नेतान्याहू यांचेच फावले असून देशांतर्गत राजकारणातील वाद टाळण्यासाठी प्रत्यक्षात ते गाझा युद्धाचा वापर करताना दिसतात. युद्ध थांबले की नेतान्याहू यांचा भ्रष्टाचार आणि भ्रष्ट राजकारण या विषयाच्या चर्चेस तोंड फुटेल आणि अनेक आघाडयांवर या पंतप्रधानांस विरोधकांचा सामना करावा लागेल. तेव्हा ही परिस्थिती टाळण्याचा एकमेव, राष्ट्रप्रेमी मार्ग म्हणजे युद्ध लांबवणे. देशांतर्गत राजकारणात संकटग्रस्त ठरलेल्या राजकारण्यांस परकीय आक्रमक, आक्रमणाची भीती इत्यादी मुद्दे नेहमीच हात देतात. देश संकटात आहे अशी हाळी सर्वोच्च सत्ताधीशानेच दिली की इतरांना आपसूक सत्ताधीशांच्या मागे उभे राहावे लागते. पंतप्रधान नेतान्याहू याचाच फायदा घेताना दिसतात. म्हणूनच त्यांना कोणत्याही परिस्थितीत युद्ध थांबवावे असे वाटत नाही. स्वतःची खुर्ची वाचावी यासाठी अश्रापांचे प्राण घेण्यात या राजकारण्यांस काहीही वाटत नसेल तर हा इसम किती निर्ढावलेला आहे याची प्रचीती येईल. हा संघर्ष गेले सुमारे पाच महिने सुरू असून त्यात आतापर्यंत ३२ हजारांहून अधिक गाझावासीयांचे प्राण गेले आहेत आणि त्यापैकी दोनतृतीयांश तर केवळ महिला आणि बालके आहेत. तेव्हा हा नरसंहार थांबवणे अत्यावश्यक. पण तेच नेतान्याहू यांस नको. हमास या दहशतवादी संघटनेने अकारण केलेला दहशतवादी हल्ला हे केवळ निमित्त. त्या हल्ल्याने समग्र गाझा, पॅलेस्टाईनादी परिसर बेचिराख करण्याची संधीच युद्धखोर नेतान्याहू यांस मिळाली. त्या दहशतवादी हल्ल्यामुळे खुद्द नेतान्याहू यांचे पॅलेस्टिनी भूमीतील उद्योग दुर्लक्षित राहिले आणि ज्यांच्या भूमीत इस्त्रायली बेकायदा घुसखोरी करत होते त्याच भूमीत अधिकृतपणे घुसून सामान्यांचा जीव घेण्यास वाव नेतान्याहू यांस मिळाला. आताही ते हमास चा पुरता बीमोड केल्याखेरीज मी स्वस्थ बसणार नाही अशा वल्गना करतात. पण म्हणजे काय, याचे उत्तर त्यांच्याकडे नाही. हमास ही त्या परिसरात सर्वव्यापी आहे आणि तिचे काही एक कार्यालय आहे, अधिकृत यंत्रणा आहे असे नाही. त्यामुळे कोणाही गाझावासीयांस इस्त्रायली सैनिक मारतात आणि हमास सदस्यास ठार केल्याचा दावा करतात. या कथित हमासवासीयांच्या शोधासाठी इस्त्रायली जवानांनी रुग्णालये, युद्धकालीन आसरा केंद्रे, मदत छावण्या यातील काही म्हणून सोडले नाही. युद्धकाळात कशाकशांवर हल्ला करावयाचा नाही, याचे काही संकेत असतात. संयुक्त राष्ट्रांचे मदत कार्यकर्ते, रेडक्रॉसचे स्वयंसेवक वा बातमीदार यांस अपाय केला जात नाही. नेतान्याहू यांनी हे सारे संकेत सहज धाब्यावर बसवले. परिणामी अर्धा डझनहून अधिक पत्रकार आणि संयुक्त राष्ट्रांचे कार्यकर्ते आतापर्यंत या युद्धात मरण पावले आहेत. परिस्थिती इतकी गंभीर की त्यामुळे युद्धग्रस्तांच्या मदतीस, त्यांचे अश्रू पुसण्यास जायला कोणी तयार नाही. गाझा पट्टी हा एक अत्यंत चिंचोळा भूभाग. सर्व बाजूंनी इस्त्रायल आणि एका बाजूने समुद्र अशी रचना. त्यामुळे गाझावासीयांच्या हालास पारावार उरलेला नाही. परिणामी समुद्रमार्गे आणि विमानातून मदत टाकण्याची वेळ अमेरिकादी देशांवर आली. अशा मदत-वाटपावरही इस्त्रायलने गोळीबार केल्याच्या तक्रारी आहेत. इतकी अमानुषता इस्त्रायल दाखवू शकतो ती केवळ पाठीशी अमेरिका आहे म्हणून. आता अमेरिकेने पाठिंबा दिला नाही तरी आम्ही युद्ध सुरूच ठेवू असे नेतान्याहू म्हणतात. पण त्या फुकाच्या वल्गना. अमेरिकेची आर्थिक-लष्करी-राजनैतिक मदत हा इस्त्रायलचा प्राणवायू आहे. इस्त्रायलने काहीही करावे आणि अमेरिकेने त्याकडे डोळेझाक करावी असे त्या देशाच्या जन्मापासूनच चालत आलेले आहे. अमेरिकेच्या इतिहासात एखादा डेमॉक्रेटिक बराक ओबामांचा अपवाद वगळता अन्य सारे नेते इस्त्रायल खूश ठेवण्यात धन्यता मानतात. त्यात आता तर अमेरिकी निवडणुकांचा काळ. अत्यंत संघटित अमेरिकावासी यहुदींची मते या लढाईत निर्णायक. त्यासाठी माजी अध्यक्ष रिपब्लिकन पक्षाचे डोनाल्ड ट्रम्प हे इस्त्रायलचे वाटेल तितके लांगूलचालन करण्यास तयार आहेत आणि त्यांनी तसे ते अनेकदा केलेही आहे. त्यामानाने डेमॉक्रेटिक पक्षीय इतका ताळतंत्र सोडत नाहीत. त्यामुळे इतके दिवस इस्त्रायलची मनमानी डेमॉक्रेटिक बायडेन कसे काय सहन करत होते हा प्रश्न होता.

अखेर ही निष्क्रियता फारच अंगाशी येते हे पाहिल्यावर बायडेन यांनाही पर्याय राहिला नाही. त्यांनी इस्त्रायलची तळी उचलणे थांबवले. पण तितक्याने भागणारे नाही. इस्त्रायलला रुळावर ठेवायचे असेल तर अमेरिकेने त्या देशास पुरवलेला पांगुळगाडा आधी काढावा. इतके कोणास शेफारून ठेवणे योग्य नव्हे.

मच्छिमारांच्या नशिबात लाखोंचा घोळ!

पालघर जिल्ह्यातील घटना, एका रात्रीत झाले लक्षाधीश

पालघर : सध्या समुद्रातील माशांची आवक कमी होत असल्याची बोंबाबोंब सुरू असताना डहाणू, सातपाटी येथील तीन मच्छीमारांचे नशीब फळफळले आहे. डहाणू तालुक्यातील वाढवण परिसरातील समुद्रात मासेमारी करत असताना डहाणू खाडी आणि सातपाटी येथील मच्छीमारांच्या जाळ्याला लाखो रुपये किमतीचे घोळ मासे लागले. शनिवार, २३ मार्च रोजी तीन मच्छीमारांच्या जाळ्याला साधारण ३०० घोळ मासे लागले असून, सोमवारीदेखील त्याच ठिकाणी तीन ते चार मच्छीमारांच्या जाळ्यात मोठ्या प्रमाणात घोळ मासे लागले आहेत. घोळ माशाच्या पोटातील पिशवीला (बोत) बाजारात मोठी किंमत मिळते. नर आणि मादी माशांच्या पिशव्यांना वेगवेगळा भाव मिळतो. शिवाय माशाच्या मांसालादेखील ६०० ते ८०० रुपये किलो दर मिळतो. ऐन होळीच्या सणावर मच्छीमारांच्या जाळ्याला घोळ लागल्यामुळे मच्छीमारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. सध्या खोल समुद्रातील मासेमारी बंद असून, समुद्रात काही अंतरावर मासेमारी केली जात आहे. घोळ प्रजातीचे मासे समुद्रात एका गटातच फिरत असून, मच्छीमारांच्या जाळ्याला लागल्याने त्यांना चांगला धनलाभ झाला आहे. डहाणू तालुक्यातील समुद्रात घोळ मासा मिळण्याचे प्रमाण कमी आहे. गेल्या काही वर्षात घोळ मासा गळाला लागण्याचे प्रमाण मोजके आहे. मात्र काही दिवसांपासून मच्छीमारांना वाढवण हद्दीतील समुद्रात मोठ्या प्रमाणात घोळ मासे मिळत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, सातपाटी येथील मच्छीमाराला ११३, डहाणू खाडी येथील मच्छिमारांना अनुक्रमे ८८, १४, ६२ आणि ४३ घोळ मासे मिळाले आहेत. या माशाच्या पोटातील पिशवी आणि मांसाच्या विक्रीतून मच्छिमारांना मोठा नफा मिळतो. याविषयी मत्स्य व्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त दिनेश पाटील यांच्याशी संपर्क केला. मात्र त्यांच्याकडे अद्याप अचूक माहिती उपलब्ध नसल्याचे त्यांनी सांगितले. काही दिवसांपासून मच्छीमारांना समुद्रात योग्य प्रमाणात मासे मिळत नाही. त्यामुळे मच्छीमार निरंतर मासेमारी करत नसून, हंगामी मासेमारी करतात. होळी सणाच्या पार्श्वभूमीवर खलाशी सण साजरा करण्यासाठी आपापल्या घरी जात असल्यामुळे बहुतांश बोटी किनाऱ्याला लागल्या असून, काही मोजक्या बोट मालकांनी समुद्रात मासेमारीसाठी बोटी उतरवल्या होत्या. त्यातच मच्छीमारांच्या जाळ्याला घोळ मासे लागले असून त्यांना मोठे यश मिळाल्याने समाधान व्यक्त होत आहे.

'जलजीवन' च्या खोदाईमुळे पाइपलाइन खुली

हातेरी ग्रामस्थांना चिंता

जव्हार : जलजीवन योजेनेतून 'हर घर पाणी' प्रत्येक कुटुंबाला घराघरात पाणी मिळून ग्रामस्थांची तहान भागणार आणि गावात सर्वत्र पाणीच पाणी मिळून पाणीटंचाई दूर होणार? अशी आशा हातेरी ग्रामस्थांना होती. मात्र पाणीपुरवठा अभियंता व अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष आणि ठेकेदाराच्या हलगर्जीने पाइपलाइनची ठिकठिकाणी अर्धवट खोदाईमुळे खुली आहे. त्यामुळे हातेरी ग्रामपंचायतमधील होत असलेले पाइपलाइनचे काम निकृष्ट होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. पाइपलाइनचे काम पूर्ण होईल की नाही, अशी चिंता ग्रामस्थांना सतावू लागली आहे. याबाबत पाणीपुरवठा विभागाने वेळीच पाइपलाइन दुरुस्त करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. जव्हार तालुक्यातील हातेरी ग्रामपंचायत हद्दीत हातेरी, कोकणपाड, ठाकूरपाडा, रुईपाडा, बोरीचापाडा ह्या पाड्यांसाठी शासनाच्या जल जीवन योजनेतून १ कोटी ३५ लाख रुपयांची पाइपलाइन योजना सुरू आहे. जल जीवन योजनेतील पाइपलाइनाचा ठेका, भिवंडी येथील, भगवती इंटर प्रायजेस कासने या ठेकेदारांना हे काम दिले आहे. त्यातच काँक्रीटीकरण केलेले कामदेखील अर्धवट आणि निकृष्ट असल्याचे नागरिकांनी सांगितले. हातेरी येथील जलजीवन पाइपलाइनचा ठेकेदार हा ठाणे जिल्ह्यातील आहे. पाइपलाइनची कामे पूर्ण होईल की नाही? अशा प्रश्न ग्रामस्थांना पडला आहे. बाहेरील ठेकेदार अनेकदा विविध कामांत अपूर्ण कामे टाकून पळाल्याचा ग्रामस्थांना अनुभव आहे. याचप्रमाणे आदिवासी भागातील जलजीवन योजनेतील पाइपलाइनचा बट्ट्याबोळ व्हायला नको, असाही प्रश्न ग्रामस्थांना पडला आहे. हातेरी भागात जलजीवन योजनेच्या कामांकडे पंचायत समिती पाणीपुरवठा विभागाच्या पाणीपुरवठा अभियंत्याचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांचा आहे.

> "आमच्या गावातील पाइपलाइनचे काम कसेबसे हळूहळू सुरू आहे. परंतु हे जलजीवन पाइपलाइनचे काम पूर्ण होते की नाही, अशी चिंता आहे.
>
> – जगदीश जंगली, ग्रा. पं. सदस्य

Alert lawyer foils Rs 80 lakh fraud bid

Mumbai

A quick-thinking lawyer from Mumbai foiled an attempt by scammers to rob her of Rs 80 lakh by impersonating representatives of a large logistics firm and police authorities, according to police. On Monday, the fraudsters called the 30-year-old woman, falsely stating that a shipment she was about to transport to Iran contained the synthetic drug LSD. They impersonated workers of a well-known logistics company and claimed that an FIR had been filed against her. They asked for her Aadhaar and PAN card information to address the dispute, reported PTI. According to the report, the scammers then allegedly connected her to a person posing as a senior police official investigating the case. To settle the falsified accusations, they told her to transfer Rs 80 lakh from her bank account to a designated account. To lend legitimacy to their scam, the fraudsters emailed her an agreement form. Despite giving in to pressure and initially disclosing her bank account information, the lawyer became suspicious and decided to report the incident to the authorities. She went to the Bandra police station and filed a report on Monday. Following her report, a case was filed against the culprits, and an investigation has begun, the PTI report added. Meanwhile, in another incident of fraud, an owner of an investment firm from Thane district has been booked by police for defrauding investors by promising them hefty profits on shares. The accused identified as Pratik Remne reportedly has defrauded several people of Rs 44 lakhs. According to another PTI report, Remne has siphoned off money from at least 17 persons.

Skipper Pandya eyes dominating win vs SRH after facing defeat in the opener

Hyderabad

After the script went horribly wrong for Hardik Pandya on Sunday at Ahmedabad, the new Mumbai Indians skipper would like to make amends in their second match against Sunrisers Hyderabad at the Rajiv Gandhi International Stadium on Wednesday. His leadership skills came under a lot of scrutiny in the first match. The Indian all-rounder's decision to switch to MI from Gujarat Titans was least welcomed by the hostile Narendra Modi Stadium crowd. He was booed before the night ended in a six-run loss for MI. To add to his woes, Pandya failed with bat and ball. Interestingly, the crowd cheered for India skipper Rohit Sharma, who was removed from MI captaincy this season. A few eyebrows were raised when Pandya repeatedly altered the fielding position of Rohit in the deep.

The MI skipper faces a litmus test against SRH. He is aware of it and being a seasoned campaigner, he will look to be more positive in Wednesday's match. He will bank on Rohit, who hit a pleasing

29-ball 43 against the Titans. Ishan Kishan, who was in the news for the wrong reasons during the home Test series against England, went for a duck. The flamboyant left-hander needs to be among runs after his fallout with the national selectors. For exciting left-hander Tilak Varma, it is a homecoming. The Hyderabad Ranji skipper, who hosted a dinner for his teammates on Monday, impressed with his attacking style of batting last season and would surely like to make a big mark in front of his home crowd. The ebullient Jasprit Bumrah continued his fine run. His first wicket, to dismiss Wriddhiman Saha with a yorker, spoke of his class. He returned amazing figures of 4-0-14-3 against the Titans.

It will be an interesting duel between the Smiling Assassin and the dangerous South African Heinrich Klassen, who hit a blazing 29-ball 63 for SRH against Kolkata Knight Riders. Other batters like Mayank Agarwal, Abhishek Sharma (impact player) and Rahul Tripathi had reasonable outings. However, it is the bowling that could be a worry for the Pat Cummins-led SRH team, particularly the experienced Bhuvneshwar Kumar. The former India swing bowler gave away only eight runs in his first two overs but Andre Russell toyed with him in the death overs.

पालिका प्रशासनाने उडवला विकासकामांचा धुरळा

शहरात वाढलेल्या प्रदुषणामुळे उल्हासनगरकर झाले त्रस्त

■ **उल्हासनगर** : उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तथा मल वाहिनी टाकण्याचे काम शहरात सुरू आहे. त्यामुळे शहरात सर्वच रस्ते खोदण्यात आले आहेत. या रस्त्यांची अवस्था बिकट झाली असून हवेत उडणाऱ्या मातीच्या धुळीमुळे रहिवासी मात्र त्रस्त झाले आहेत. अशी ही विकासकामे लोकसभा निवडणुकीपूर्वी पूर्ण करून मतदारांना 'आपलेसे'करून घेण्याचा पालिका प्रशासनाचा प्रयत्न आहे. पालिकेने आचारसंहिता काळात बैठका घेत विकासकामे पूर्ण करण्याचा केविलवाण प्रयत्न सुरू केला असल्याने नागरिकांत संताप आहे.

शहरात सात प्रमुख रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाचे काम मागील चार महिन्यांपासून सुरू आहे. या सात रस्त्यापैकी पाच रस्ते हे रिंग रोड रस्ते आहेत. तर दोन रस्ते हे अंतर्गत रस्ते आहेत. विशेष म्हणजे या रस्त्यांचे काम मंद गतीने सुरू असल्याने रस्त्यांवर धुळच धुळ आहे. या व्यतिरिक्त अमृत योजनेअंतर्गत शहरात ४१६ कोटी निविदे अंतर्गत मलवाहिन्या टाकण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. विशेष म्हणजे या मलवाहिन्या टाकल्यानंतर रस्त्याचे तत्काळ काँक्रिटीकरण तथा डांबरीकरण केले जात नसल्याने तिथेही रस्त्यावर धुळीचा धुरळा उडताना दिसत आहे. या धुळीचा परिणाम रस्त्याच्या दुतर्फा राहणारे तथा दुकानदार तसेच रस्त्यावरून रहदारी करणाऱ्यांना होत आहे.त्यामुळे याचा फटका येत्या लोकसभा निवडणुकीत बसू शकतो, मतदानाचे प्रमाण कमी होऊ शकते. ही बाब जाणून रस्त्यांच्या विकासकामाबाबत उल्हासनगर महापालिकेचे आयुक्त अजिज शेख यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभागृहामध्ये आढावा बैठकी आयोजित करण्यात येत आहेत. या बैठकीत अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे मुख्य अभियंता अर्जुन कोरगांवकर, अधिक्षक अभियंता धाबे, सहा. संचालक नगर रचना ललित खोब्रागडे, शहर अभियंता संदिप जाधव, कार्यकारी अभियंता परमेश्वर बुडगे, हनुमान खरात, तसेच संबधित कामांचे कंत्राटदार व सल्लागार उपस्थित होते. सात रस्त्यांची विकासकामे पूर्ण करण्याबाबत गती देण्यासाठी येणाऱ्या अडचणी कंत्राटदार यांच्याकडून ऐकून घेतल्या. त्या मार्गी लावण्यासाठी संबंधित विभागांना सूचना करण्यात आल्या. रस्ता रुंदीकरणात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी नगररचना विभागाचे सहाय्यक संचालक ललित खोब्रागडे यांनी विकास आराखड्याप्रमाणे सीमांकन करून विहित नोटीसा प्रभाग अधिकारी यांनी बजावून लोकांची बाजू ऐकून कार्यवाहीस गती देण्याबाबत यावेळी सुचित केले. रस्त्यात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे येणारे खांब व ट्रान्सफॉर्मर आवश्यक त्या ठिकाणी स्थलांतरित करण्याबाबत सूचना दिल्या. रस्त्यात येणाऱ्या झाडांच्या बाबतीत विहित प्रक्रियेने झाडांचे स्थलांतर करून झाडे जगवण्यासाठी कारवाई करण्याची उद्यान विभागास सूचना केली असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

■ मलनिस्सारण योजनेची कामे व रस्त्यांची कामे परस्पर समन्वयाने मार्गी लागण्यासाठी दोन्ही कामांचे कंत्राटदार यांचा संयुक्त आढावा घेण्यात आला व त्यास गती देण्यासाठी सूचित केले. विकासकामे सुरू असलेल्या ठिकाणी धुळ उडून प्रदूषण होणार नाही.

■ यासाठी पाणी फवारणी करण्यात यावी व ज्या रस्त्यांचे मलवाहिनी टाकून काम पूर्ण झाले आहे त्या रस्त्यावर तत्काळ पाणी मारून दबाई करून रस्त्याचे प्रकारानुसार डांबरीकरण किंवा कॉंक्रिटीकरणाचे काम पूर्ण करावे असे निर्देश महानगरपालिका आयुक्त अजीज शेख यांनी या बैठकीत दिले.

■ कामांची गती वाढावी यासाठी दर आठवड्याला अशी बैठक आयोजित करण्यात येणार असून याबाबतीत नागरिकांच्या तक्रारींची दखल त्वरित घेऊन उपाययोजना करून काम वेळेत पूर्ण करावे अशी आयुक्तांनी सूचना दिली.

वाहतूक पोलिसांची दोन हजार चालकांवर कारवाई

■ **ठाणे** : ठाणे वाहतूक शाखेने होळी आणि धूळवडच्या निमित्ताने पाच परिमंडळात आयुक्तालयाच्या हद्दीत कडक मोहीम राबवली. या कारवाईत वाहतूक पोलिसांनी तब्बल २ हजार ७४३ वाहन चालकांवर विविध कलमाखाली कारवाई केली. यावेळी तब्बल १७३ चालक मद्य घेऊन वाहन चालविताना आढळल्याची माहिती वाहतूक पोलिसांच्या सूत्रांनी दिली. ठाणे वाहतूक विभागाने ७०० पोलिस अधिकारी आणि कर्मचारी हे ठाणे आयुक्तालायच्या हद्दीतील परिसरात होळी-धूलिवंदनासाठी तैनात केले होते. त्यांनी केलेल्या नाकाबंदीत नशापान किंवा मद्य प्राशन करून दुचाकी, चारचाकी वाहने चालविणाऱ्या तब्बल १७३ जणांवर कारवाईचा बडगा उगारला. तर शमतेपेक्षा जास्त प्रवासी दुचाकीवर बसविल्या प्रकरणी ६६३ जणांवर कारवाई करण्यातआली.

तडिपार आरोपीस अटक

■ **भिवंडी**: दोन वर्षांकरता विविध जिल्ह्यातून तडिपार करण्यात आलेला आरोपी भिवंडीत आढळून आल्याने त्यास नारपोली पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहे.नागेश बाजीराव भोसले (२६ रा. राहनाळ) असे अटक केलेल्याचे नाव आहे. नागेशला ६ जानेवारी २०२३ रोजी ठाणे जिल्हा,ठाणे शहर पोलीस आयुक्तालय,मुंबई शहर व उपनगरे,पालघर,पुणे व रायगड जिल्ह्यातून दोन वर्षांकरता हद्दपार करण्यात आले आहे.मात्र तो २३ मार्च रोजी रात्रीच्या सुमारास राहनाळ येथील मराठा पंजाब हॉटेलच्या बाजूला कोणत्याही प्रकारची परवानगी न घेताच आढळून आल्याने कारवाई केली.

विनापरवाना पिस्तूल बाळगणारास अटक

■ **उल्हासनगर**: ठाणे पोलीस आयुक्तालयाकडून १५ मार्च ते २९ मार्चपर्यंत कोणत्याही व्यक्तिला त्याच्या ताब्यातील शस्त्रे, तलवार, भाला, बंदूक अशा प्रकारचे कोणतेही शस्त्र बाळगण्यास मनाई आदेश असताना देखील २६ मार्च रोजी मध्यरात्रीच्या सुमारास बदलापूर येथील कात्रप, थारवाणी मिलेनियम सिटीजवळ एकजण आपल्याजवळ पिस्तूल बाळगत असल्याची माहिती उल्हासनगर गुन्हे शाखेचे पोलीस कर्मचारी राजेंद्र थोरवे यांना मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजू सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली रमेश केंजळे, शेखर भावेकर, राजेंद्र थोरवे यांच्यासह इतर पोलीस पथकाने सापळा रचून अटक केली.

लहान भावाने रोख रक्कम आणि दागिने लांबवले

■ **भिवंडी**: लहान भावानेच मोठ्या भावाचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.याप्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात लहान भावाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.एहसानअली जावेद अहमद अन्सारी (२१) असे गुन्हा दाखल झालेल्या लहान भावाचे नाव आहे.शहरातील गैबीनगर अपार्टमेंटमध्ये राहणारे एहतेशाम अहमद जावेद अहमद अन्सारी यांनी राहत्या घरात १ लाख ७४ हजार ४५० रुपयांच्या रोख रक्कमेसह दागिन्यांचा ऐवज त्यांचा लहान भाऊ एहसानअलीने ५ जानेवारी ते २० मार्च २०२४ दरम्यान चोरून नेल्याचे उघड झाले आहे.त्याच्या विरोधात मोठा भाऊ एहतेशामच्या फिर्यादीवरून शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

महिलेला चाकूचा धाक दाखवून लुटले

सहा तासात रिक्षाचालक जेरबंद

■ **डोंबिवली** : डोंबिवली पूर्वेतील आजदेगावातून कल्याणमधील एपीएमसी. मार्केटला जाण्यासाठी रिक्षात बसलेल्या महिलेला निर्जनस्थळी नेऊन तिच्या गळ्याला चाकू लावून सोन्याचे दागिने, रोख रक्कम, मोबाईल, पर्स असा एकूण ३६ हजार रुपये किमतीचा ऐवज लुटून पसार झालेल्या रिक्शाचालकाला डोंबिवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्यानंतर अवघ्या सहा तासाच्या आत पोलिसांनी अटक केली. गुन्ह्यात सहभागी असणाऱ्या आणखी दोघा अल्पवयीन मुलांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. अनिल अशोक खिल्लारे (२२) राहणार , शेलार चौक, कल्याण रोड, डोंबिवली असे अटक केलेल्या रिक्षाचालकाचे नाव आहे.फिर्यादी महिला घरडा सर्कल येथून एपीएमसी.मार्केट कल्याण येथे जाण्यासाठी रिक्षात बसल्या होत्या.रिक्षाचालक व रिक्षात बसलेल्या दोघांनी संगनमत करून महिलेला कल्याण येथील बीएसयुपी . बिल्डींग जवळील मैदान, न्यू गोविंदवाडी येथे निर्जनस्थळी नेवून रिक्षा थांबवली.रिक्षाचालक अनिलने महिलेच्या गळ्याला चाकू लावत जीवे ठार मारण्याची धमकी दिली. रिक्षातील दोघांनी महिलेकडील रोख रक्कम, मोबाईल, पर्स असा एकूण ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल हिसकावून पळ काढला.

◆याप्रकरणी महिलेने पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या फिर्यादीवरून डोंबिवली पोलिसांनी सहा तासाच्या आत रिक्षाचालकाला अटक केली तर दोघा अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले.प्रमुख आरोपी अनिल हा रिक्षाचालक असून त्याच्या बरोबर चोरीच्या गुन्हातील दोघे अल्पवयीन मुलांवर चोरी, घरफोडी, जबरी चोरी, दरोडयाची तयारी असे एकूण चार गुन्हे डोंबिवली व वाशिंद पोलीस ठाण्यात दाखल आहेत.

◆ या गुन्हासाठी वापरलेली रिक्षा आणि चाकू पोलिसांनी हस्तगत केला आहे.डोंबिवली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल जवादवाड यांच्या मार्गदर्शनाखाली डोंबीवली पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहाय्यक पोली निरीक्षक बळवंत भराडे, हवालदार सुनिल भणगे,

भिवंडी पालिकेने विनापरवाना जलवाहिनी तोडली

■ **भिवंडी**: भिवंडी शहर महानगर पालिका कार्यक्षेत्रात पालिका प्रशासन व पाणीपुरवठा विभागाची कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीरपणे रस्ते खोदून जलवाहिनी फोडून नळ कनेक्शन घेतले जात आहेत. त्यामुळे शहरांमध्ये कृत्रिम पाणी टंचाईचा प्रश्न निर्माण झाला आहे.याबाबत आयुक्त अजय वैद्य यांच्याकडे तक्रार जाताच त्यांनी बेकायदेशीरपणे जलवाहिनी फोडून नळ कनेक्शन घेणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले.त्यामुळे पाणीपुरवठा विभागाच्या पथकाने शहरातील शांतीनगर नागांव परिसरातील दोन सायजिंग कंपन्यावर कारवाई केली. आतापर्यंत सुमारे २२ ठिकाणी पाणी चोरी प्रकार उघडकीस आला असून विविध पोलीस ठाण्यात याबाबत तक्रारी दाखल करण्यात आल्याची माहिती पाणी पुरवठा विभागाचे पथक प्रमुख विराज भोईर यांनी दिली.

भिवंडी शहर परिसरात असलेल्या कापड कापड डाईंग,सायजिंग कंपन्या, यंत्रमाग कारखाने, इमारत व काही चाळींमध्ये बेकायदेशीरपणे रस्ते खोदून जलवाहिन्या फोडून नळ कनेक्शन घेतले जात आहेत. त्यामुळे शहरांमध्ये विविध भागात कृत्रिम पाणी टंचाई निर्माण होऊन अनियमित पाणीपुरवठा होत आहे.

होणारी पाणी चोरी थांबवावी याबाबत महापालिका आयुक्त अजय वैद्य यांच्याकडे तक्रार जाताच त्यांनी पाणीपुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन बेकायदेशीर नळ कनेक्शन व रस्ते खोदाई करणाऱ्यावर कारवाई करण्याचे निर्देश दिले त्यानुसार पथकाचे प्रमुख विराज भोई यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन शहरातील शांतीनगर नागाव परिसरात असलेली १) अतुल सायजिंग,नारायण कंपाऊन्ड, भिवंडी. २) राज सिथेंटीक्स बाबला कंपाऊन्ड, भिवंडी यांनी महापालिकेची कोणतीही पूर्व परवानगी न घेता रस्त्याची खोदाई करून व नाल्यामधून जलवाहीनी टाकण्यात आली असल्याचे तपासणी उघड झाले.

सायजिंग चालकांविरोधात गुन्हा दाखल



■ महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागातील काही कर्मचारी व अधिकाऱ्यांचे आशिर्वादाने बोगस प्लंबर बेकायदेशीररित्या नळ कनेक्शन भिवंडीमध्ये देत आहेत याबाबत सुद्धा आयुक्तांनी चौकशी करावी अशी मागणी होत आहे.

■ त्यामुळे विराज भोईर यांनी त्यांचे विरोधात शांतीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यामुळे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.दरम्यान या पाण्याची पाईप लाईन महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांमार्फत कापून पालिकेच्या वहाळदेवी वॉटर सप्लाय येथे जमा करण्याची कारवाई करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

डोंबिवलीत कोयता घेवून दहशत माजवणाऱ्याला अटक

■ **डोंबिवली** : डोंबिवली पोलीस स्टेशनच्या रेकॉर्डवरील नामचीन व तडिपार केलेला गुंड गणेश उर्फ गटल्या बाळू आहिरे हा इंदिरानगर झोपडपट्टी, शेलार नाका परिसरात हातात धारदार भला मोठा कोयता घेऊन दहशत माजवत फिरत आहे,अशी खबर कल्याण क्राईम ब्रांचला मिळाली . कल्याण क्राईम युनिट -३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नरेश पवार यांना कळविताच त्यांनी विलंब न लावता त्यांच्या मार्गदर्शनाखाली या ठिकाणी तत्काळ कारवाई करण्याचे आदेश पथकाला दिले .त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण,पोलीस हवालदार दत्ताराम भोसले,विश्वास माने, गुरुनाथ जरग,बालाजी शिंदे,दिपक महाजन यांच्या पथकाने लागलीच सदर ठिकाणी जाऊन तडीपार गुंड गणेश उर्फ गटल्या बाळू आहिरे (२२) राहणार , शेलार नाका इंदिरानगर झोपडपट्टी डोंबिवली पूर्व हा पोलिसांना पाहून पळू लागला .पोलीस पथकाने त्याचा पाठलाग करीत थोड्याच अंतरावर धारदार कोयत्यासह झडप घालून पकडले, त्याला नोव्हेंबर २०२३ मध्ये १८ महिन्यासाठी ठाणे जिल्ह्यातून हद्दपार केले असताना त्याने मनाई आदेशाचा भंग करून मिळून आला आहे.त्याच्यावर डोंबिवली पोलीस स्टेशनचे रेकॉर्ड नुसार घातक शास्त्राने वार करून दहशत माजवणे असे एकूण ४ गुन्हे दाखल असून त्याचे वर दोन वेळा प्रतिबंधक कारवाई पोलिसांनी केली आहे.

अपघातग्रस्त तळीरामांचा रुग्णालयातच 'शिमगा'

डॉक्टरांचे उपचार नको म्हणून त्यांनी ठोकल्या बोंबा!

■ **कल्याण**: रंगपंचमी म्हटली की तळीरामांची चांगलीच चंगळ असते. त्यामुळे रंगांचा बेरंग होण्याच्या घटनाही होत असतात. कल्याणमध्ये अपघातग्रस्त झालेल्या तळीरामांनी उपचार नको म्हणून रुग्णालयातच बोंब ठोकत शिमगा केल्याची घटना घडली आहे. त्यांची समजूत काढताना पोलिसांच्याही यावेळी चांगलेच नाकीनऊ आले होते. कल्याणच्या वालधुनी पुलावर सोमवारी सायंकाळी साडे सातच्या सुमारास बाईकवरून एक व्यक्ती पडला आणि गंभीर जखमी झाला. यावेळी तेथे असलेल्या ट्राफिक वॉर्डनने त्याला उचलून उपचारासाठी पालिकेच्या रुक्मिणीबाई रुग्णालयात आणले. त्याच्यापाठोपाठ त्याच्यासोबत असलेला दुचाकीस्वार देखील तिकडे दाखल झाला. दोघांनी उपचार नको आम्हाला जाऊ द्या, असे सांगत रुग्णालयात जवळपास अर्धा ते पाऊण तास धिंगाणा घातला. मी मुंडेंचा नातेवाईक आहे, पत्रकार आहे, असे सांगत हा धिंगाणा जवळपास अर्धा ते पाऊण तास सुरू होता. यावेळी या दोघांनी ट्राफिक वॉर्डनसह पोलिसांशीही अरेरावी केली. त्यांचा अवतार बघून महात्मा फुले पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकाऱ्याने दोघांना पुन्हा गाडीवर बसून घरी जाण्याची परवानगी दिल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात आले. पोलीसांनी सोडून दिल्यावर दोघेही मद्यपी रुक्मिणीबाई रुग्णालयातून बाहेर पडले आणि काही अंतरावर जात नाही तोच पुन्हा त्यांचा अपघात झाला. आजूबाजूच्या नागरिकांनी रक्तबंबाळ अवस्थेत दोघांनाही उपचारासाठी रुग्णालयात आणले. मात्र त्यांनी रुग्णालयात पुन्हा धिंगाणा घालण्यात सुरुवात केली होती. त्यांना समजवता समजवता पोलिसांसह रुग्णालयीन कर्मचाऱ्यांचे देखील नाकी नऊ आले होते. अखेर पोलिसांनी त्यांच्यासमोर हात टेकले आणि त्यांना जावू दिले. दरम्यान या घटनेचा व्हिडिओही समोर आल्याने मोठी चर्चा होत आहे. उपचारच नको म्हणून बोंबा ठोकरण्यांची चर्चा आहे.

भिवंडीत धूलिवंदनाच्या रंगाचा बेरंग, तरुणावर हल्ला

■ **भिवंडी**: शहरातील नारपोली परिसरातील भंडारी कंपाऊंडमधील एका चाळीत राहणाऱ्या तीन मित्रांपैकी एकाने धक्का लागल्याच्या क्षुल्लक वादातून अन्य तिघांपैकी एकावर धारदार शस्त्राने वार करून त्यास जखमी केल्याने धूलिवंदनाच्या रंगाचा बेरंग झाल्याची घटना समोर आली आहे.याप्रकरणी भोईवाडा पोलीस ठाण्यात तिघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. अभिदंन बच्चू सरोज (१९),मनमोहन राकेशकुमार पांडे (१८),विकास शेषनाथ पटेल (१९) अशी अटक केलेल्या तरुणांची नावे आहेत.२५ मार्च रोजी शहरासह ग्रामीणमध्ये धूलीवंदनाची धूलवड सुरू असतानाच अशाच प्रकारे भिवंडीतील नारपोली येथील भंडारी कंपाऊंड मधील नॅशनल हॉटेलच्या समोरील जय अंबे चाळीत धूलिवंदन सुरू होते.त्यावेळी जखमी अमरेश कुमार सावली प्रसाद यादव हा सतिष यादव व विक्रम यादव यांच्या सोबत त्याचा उत्तर प्रदेशातील मुळ गावाकडचा मित्र खेमराज यादव यास भेटण्यास गेला होता.त्यास भेटून तिघेही बिल्डिंगमधून खाली उतरत असताना अमरेशचा अभिदंन यास धक्का लागला.याच रागातून तिन्ही आरोपींनी अमरेश व सतिषला शिवीगाळ करून मारहाण केली.तर मारहाणी दरम्यान विकासने अमरेशच्या पाठीवर धारदार शस्त्राने वार करून त्यास गंभीर जखमी केले आहे.त्याच्यावर ग्लोबल हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.

क्षुल्लक कारणावरून मुलासह पती-पत्नीला मारहाण

■ **कल्याण**: कल्याणच्या गांधारी परिसरातील इमारतीत राहणाऱ्या दोन परिवारांमध्ये क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादातून एका कुटुंबातील परिवाराने दिव्यांग मुलासह पती- पत्नीला मारहाण केल्याची घटना घडली आहे. केली. या घटनेचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. गांधारी परिसरातील लोढा गार्डन संकुलातील जय या इमारतीमध्ये वास्तव्यास असलेल्या दोन कुटुंबात वाद निर्माण झाला. दुपारच्या सुमारास गार्डनमध्ये काही मुले झोक्याबरोबर खेळत होती.त्याचा आवाज होत असल्याने इमारतीमधील मदनसिंग बिस्ट या रहिवाशाने मुलांना तेथून जाण्यास सांगितले. त्यामुळे संतापलेल्या लक्ष्मण नाईक, त्यांची पत्नी आशा यांनी बिस्ट कुटुंबासोबत वाद घातला. याच वादाचे पर्यावसन हाणामारीत झाले. यामध्ये बिस्ट यांच्यासह त्यांचा दिव्यांग मुलगा व पत्नीला देखील मारहाण करण्यात आली. हा प्रकार घडत असताना इमारतीतील काही जणांनी वाद मिटविण्याचा प्रयत्न केला.

मुंबईच्या धर्तीवर पुण्यात आपत्ती व्यवस्थापन कक्ष बनणार कायमस्वरूपी

■ **पुणे, प्रतिनिधी** :

पावसाळ्यात उद्भवणाऱ्या पूरस्थितीचा सामना करण्यासाठी पुणे महापालिकेकडून मुंबईच्या धर्तीवर आपत्ती व्यवस्थापनासाठी स्वतंत्र आणि पूर्णवेळ कर्मचारी नियुक्त केले जाणार आहेत. या कक्षात नियुक्त कर्मचाऱ्यांना तसे प्रशिक्षणही दिले जाणार आहे. महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनी ही माहिती दिली. आयुक्त भोसले यांनी मंगळवारी आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या कामाचा आढावा घेतला. तसेच पावसाळापूर्वी कामांची माहिती घेतली.

या बैठकीस सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. दरम्यान, मागील वर्षी शहरात सुमारे १७१ ठिकाणी पावसाने पाणी साचले होते. या ठिकाणी महापालिका प्रशासनाकडून गेल्या वर्षभरात कामे केली असून, या कामांची पाहणी आयुक्त स्वतः करणार आहेत. हडपसर परिसरात ही पाहणी केली जाणार आहे. मनपातर्फे आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षासह पावसाळी कामांच्या नियोजनासाठी आवश्यक कर्मचारी क्षेत्रीय कार्यालय तसेच पथ विभाग, ड्रेनेज विभाग, पथ विभाग, मलनिःसारण विभागाकडून नेमले जातात. त्यासाठी, खासगी ठेकेदारांची मदत घेतली जाते.

मात्र, आता मुंबई धर्तीवर कायमस्वरूपी कर्मचारी नेमण्याचे नियोजन आहे. या कर्मचाऱ्यांची नियुक्ती प्रत्येकी तीन वर्षांसाठी असेल. नियुक्तीपूर्वीच त्यांना आवश्यक ते प्रशिक्षण दिले जाईल. शहरात अग्निशमन दलाचे पंधरा केंद्र आहेत. तसेच महालिकेच्या ४७ रुग्णवाहिका आहेत. आपत्कालिन परिस्थितीत केवळ अग्निशमन दलच कार्यरत राहता कामा नये. त्यांना इतर विभागांनी मदत करणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांचा इतर विभागांशी समन्वय ठेवला जाणार आहे.

आजच्या बैठकीत आपत्ती व्यवस्थापनाच्या कामाचा आढावा घेण्यात आला. मात्र, पुणे महापालिका केवळ पावसाळ्यातच हा कक्ष कार्यान्वित करते. त्यामुळे मुंबईच्या धर्तीवर तो कायमस्वरूपी ठेवण्याचा विचार सुरू आहे. त्यासाठी, पालिकेचे पथक लवकरच मुंबई महापालिकेच्या कक्षाचा अभ्यास करून अहवाल सादर करणार आहे.

- राजेंद्र भोसले, आयुक्त, महापालिका

वीज ग्राहकांवर वाढीव बिलाचा बोजा!

वीज ग्राहकांवर वाढीव बिलाचा बोजा!

■ **मुंबई**, बहुवार्षिक वीज दरवाढ याचिके अंतर्गत वीज नियामक आयोगाने एका वर्षाच्या नियंत्रण कालावधीसाठी मंजूर केलेली वीज दरवाढ नव्या आर्थिक वर्षात म्हणजे १ एप्रिलपासून लागू होणार आहे. त्यानुसार महावितरणसह टाटा पॉवर आणि अदाणी इलेक्ट्रिसिटीच्या दरात वाढ होणार आहे. अशात उन्हाळ्यामुळे गेल्या पंधरा दिवसांपासून विजेच्या मागणीत मोठी वाढ नोंदली जात आहे. त्यामुळे एप्रिल-मे महिन्यात वाढीव वीजबिलाच्या माध्यमातून सर्वसामान्य घरगुती वीज ग्राहकांबरोबरच औद्योगिक आणि वाणिज्यक वीज ग्राहकांच्या डोक्यावर बोजा पडणार आहे. त्यामुळे सामान्य घरगुती वीज ग्राहकांचे महिन्याचे बजेट कोलमडणार आहे. वीज नियामक आयोगाकडून (एमईआरसी) बहुवार्षिक वीज दरवाढ केली जाते. त्यानुसार २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीसाठी वीज आयोगाने जनसुनावणी घेत मार्च २०२० मध्ये पाच वर्षासाठी वीज दर निश्चित केले होते. त्यानंतर आयोगाने मागील वर्षी २०२३-२४ आणि २०२४-२५ या दोन वर्षासाठीच्या महसुली आवश्यकतेचा आढावा घेत दर निश्चित केले. तसेच टाटा पॉवरच्या वीज दरवाढीबाबत नुकतेच आदेश दिले आहेत. त्यानुसार १ एप्रिलपासून महावितरण, अदानी इलेक्ट्रिसिटी आणि टाटा पॉवरचे नवे वीज दर लागू होणार आहेत. दरवाढीबरोबरच विजेचा वाढता वापर हेही बिल फुगण्याचे प्रमुख कारण आहे. ग्राहकांच्या वीज वापर गटानुसार विजेचे वेगवेगळे दर आहेत. यात ०-१०० युनिट वीजवापर असलेल्या ग्राहकाला पहिल्या टप्प्यातील सर्वात कमी वीजदर लागतो. एखाद्या ग्राहकांचा १० युनिट वीज वापर असला, तरी किंवा ९९ युनिट वीज वापर असला, तरी पहिल्या टप्प्याचा दर लागतो. मात्र ९९ युनिट वीज वापर असलेल्या ग्राहकाचा वीज वापर केवळ दोन युनिटने वाढला, तरी तो १०१-३०० युनिट वीज वापराच्या गटात जातो. त्यामुळे त्याला पहिल्या गटाच्या तुलनेत ५०-६० टक्के जास्तीचा दर लागतो. त्यामुळे ग्राहकांच्या वीजबिलात मोठी वाढ होते. त्यामुळे ग्राहकाने आपल्या वीजवापरावर लक्ष ठेवत काहीशी वीजबचत केली, तर त्यांचे बिल कमी येऊ शकते.